सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ५५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १९ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## वेलकम बॅक सुनिता विलियम्स ९ महिन्यांनी पृथ्वीवर सुखरूप ‘ग्रह वापसी’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९वाशिंग्टन**

भारतीय वंशाच्या नासाच्या अंतराळवीर सुनिता विल्यम्स आणि सहकारी बुच विल्मोर यांचे आज (ता.१९) पहाटे पृथ्वीवर आगमन झाले. भारतीय वेळेनुसार त्यांना घेऊन येणारे यान ३ वाजून २७ मिनिटांनी फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर किनारपट्टीवर स्प्लॅशडाउन झाले.



फक्त आठ दिवसांच्या कामगिरीवर गेलेल्या सुनिता विल्यम्स ९ महिन्यांपेक्षा अधिक काळा अंतराळात अडकल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या आगमनाकडे जगाचे लक्ष लागले होते. सुनिता विल्यम्स आणि सहकारी बुच विल्मोर यांच्या आगमनाने अमेरिकेतच नव्हे तर भारतातील त्यांच्या मुळ गावी उत्साहाचं वातावरण आहे.

नासाचे अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर ९ महिन्यांनी सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले. त्याचे पुनरागमन स्पेसएक्सच्या ड्रॅगन अंतराळयानातून झाले. या अंतराळयानातून १७ तासांच्या प्रवासानंतर हे दोघे पृथ्वीवर परतले.आज पहाटे ३.२७ वाजता ड्रॅगन अंतराळयान कॅप्सूल फ्लोरिडाच्या किनाऱ्याजवळ समुद्रात कोसळले. यानंतर, अंतराळयानातील सर्व प्रवाशांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी पुढील प्रक्रिया सुरू झाली आहे.

यावेळी नासाकडून अंतराळवीरांच्या परतीचे थेट प्रक्षेपण करण्यासह त्याबद्दल अपडेट्स दिल्या जात होत्या.नासाचे अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर जून २०२४ पासून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर होते. दोघेही फक्त एका आठवड्यासाठी गेले होते पण अंतराळयानातून हेलियमची गळती झाल्यामुळे आणि वेग कमी झाल्यामुळे त्यांना नऊ महिने अंतराळ स्थानकावर राहावे लागले. सुनीता विल्यम्सला घेऊन जाणारे अंतराळयान सकाळीच आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून अनडॉक झाले.

## त्यावेळी मी चुकलो, आज मोदींच्या धोरणामुळेच देश मजबूत स्थितीत; शशी थरुरांकडून स्तुतीसुमने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

तीन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धामुळे जगात दोन गट पडले. एकाने रशियाची बाजू घेतली, तर दुसऱ्याने युक्रेनची बाजू घेतली. अशा कठीण प्रसंगी भारताने तटस्थ राहण्याचा निर्मय घेतला. यापूर्वी भारताच्या याच धोरणावर टीका करणारे काँग्रेस नेते शशी थरुर आता भारताचे कौतुक करत आहेत. थरुर यांनी मान्य केले की, भारताच्या संतुलित मुत्सद्देगिरीमुळेच जागतिक स्तरावर आपल्या देशाचे महत्त्व वाढले आहे.



रशिया-युक्रेन युद्धादरम्यान भारताच्या तटस्थ धोरणावर काँग्रेस खासदार शशी थरुर यांनी टीका केली होती. पण, आता थरुर यांची नवी प्रतिक्रिया आली आहे. भारताच्या धोरणाबाबत त्यांनी केलेली पूर्वीची टीका चुकीची असल्याचे त्यांनी मान्य केले आणि आजच्या परिस्थितीत हे धोरण यशस्वी होताना दिसत असल्याचे म्हटले. ते म्हणाले, 'मी अजूनही माझ्या चेहऱ्यावरील डाग पुसत आहे, कारण फेब्रुवारी २०२२ मध्ये संसदीय चर्चेत मी एकमेव व्यक्ती होतो, ज्याने आंतरराष्ट्रीय सनद आणि तत्त्वांचे उल्लंघन केल्याच्या आधारे भारतीय भूमिकेवर टीका केली होती.'

रायसीना डायलॉगमध्ये बोलताना शशी थरूर म्हणाले की, जेव्हा रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाले, तेव्हा मी भारताच्या भूमिकेवर टीका केली होती आणि हे आंतरराष्ट्रीय सनद आणि तत्त्वांचे उल्लंघन असल्याचे म्हटले होते. परंतु आता तीन वर्षांनंतर मला वाटते की, भारताच्या धोरणामुळे देश मजबूत राजनैतिक स्थितीत आला आहे. भारताच्या धोरणामुळे पंतप्रधान मोदी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष, या दोघांनाही दोन आठवड्यांच्या कालावधीत भेटू शकले. ही परिस्थिती भारताला जागतिक शांतता राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी देते, जी जगातील फार कमी देशांना प्राप्त आहे.

## ‘इंडिया’चे लवकरात लवकर भारत किंवा हिंदुस्तान करण्याबाबत निर्णय घ्या; उच्च न्यायालयाचे केंद्राला निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

लवकरच आपल्या देशाचे नाव बदलण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. 'इंडिया'चे लवकरात लवकर भारत किंवा हिंदुस्तान करण्याबाबत निर्णय घ्या, असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे लवकरात लवकर पालन करावे, यासाठी केंद्राच्या वकिलांनी संबंधित मंत्रालयांना योग्यरित्या माहिती द्यावी, असेही म्हटले आहे.




याचिकाकर्त्या नमहा यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर ही याचिका प्रातिनिधीक म्हणून घेतली जावी आणि योग्य मंत्रालयांनी त्यावर विचार करावा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने २०२० मध्ये दिले होते. परंतू, या आदेशावर काहीच कार्यवाही झाली नाही म्हणून याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. वरिष्ठ वकील संजीव सागर यांच्यामार्फत ही याचिका दाखल झाली होती. यावर लवकर निर्णय घेण्यासाठी अधिकाऱ्यांना निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने यावर सुनावणी घेत यावर निर्णय घेत याचिकाकर्त्याला काय निर्णय घेतला हे कळविण्याचे निर्देश दिले आहेत.

**काय म्हटले होते याचिकेत**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही याचिकाकर्त्याच्या अर्जावर कोणता निर्णय घेतला की नाही याबाबत केंद्राकडून कोणतीही अपडेट आलेली नाही. यामुळे पुन्हा याचिकेद्वारे या न्यायालयात जाण्याशिवाय याचिकाकर्त्याकडे पर्याय उरला नव्हता. 'इंडिया' हे इंग्रजी नाव देशाच्या संस्कृती आणि परंपरेचे प्रतिनिधित्व करत नाही आणि त्याचे नाव 'भारत' असे बदलल्याने नागरिकांना वसाहतवादी ओझ्यापासून मुक्तता मिळेल, असे याचिकेत म्हटले गेले होते. संविधानाच्या कलम १ मध्ये सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली होती. यात १९४८ चा हवालाही देण्यात आला आहे. १९४८ मध्ये तत्कालीन संविधानाच्या मसुद्याच्या कलम १ वर संविधान सभेत यावर चर्चा झाली होती, देशाचे नाव 'भारत' किंवा 'हिंदुस्तान' ठेवण्याच्या बाजूने जोरदार मागणी होत होती, असे म्हटले आहे.

## औरंगजेबाचा मुद्दा हा सध्या संयुक्तिक नाही राष्ट्रीय स्वयंसेवक हिंसाचाराचे समर्थन करत नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नागपूर**

औरंगजेबाची कबर हटवण्यावरून नागपुरातील महाल परिसरात सोमवारी रात्री दोन गटांच्या तरुणांमध्ये जोरदार राडा झाला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जमाव रस्त्यावर उतरला होता. त्यानंतर समाजकंटकांनी विविध भागात जाळपोळ करत पोलिसांवर दगडफेक केली. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. या दगडफेकीत पोलिस जखमी झाले आहेत. त्यानंतर आता नागपुरातील काही भागात पुढील आदेश येईपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. या संपूर्ण पार्श्वभूमीवर दोन दिवसांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून कुठलीही प्रतिक्रिया आलेली नव्हती.



परंतु, बुधवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभा बंगळूरूमध्ये होणार असून या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी प्रसार माध्यमांशी विचारलेल्या प्रश्नानंतर यावर सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. औरंगजेबाचा मुद्दा हा सध्या संयुक्तिक नसून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कुठल्याही प्रकारच्या हिंसाचाराचे समर्थन करत नाही, अशा स्पष्ट शब्दात सुनील आंबेकर यांनी सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या औरंगजेबाचा मुद्दा आणि नागपूरमध्ये घडलेल्या हिंचारावर संघाची भूमिका स्पष्ट केली.

**सुनील आंबेकर नेमके काय म्हणाले?**

सध्या नागपूरमध्ये झालेल्या दंगलीवर संघाची भूमिका काय आहे? असा प्रश्न पत्रपरिषदेदरम्यान अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांना विचारण्यात आला. यावर आंबेडकर यांनी संघ कुठल्याही प्रकारच्या हिंसेचे समर्थन करत नाही अशी भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर त्यांना देशात अनेक महत्त्वाचे प्रश्न असताना आता औरंगजेबाचा प्रश्न समोर करून आंदोलन करणे योग्य आहे का? असाही प्रश्न विचारण्यात आला. यावर आंबेडकर यांनी औरंगजेबाचा मुद्दा सध्या संयुक्तिक नाही, अशा शब्दात आपली भूमिका स्पष्ट केली.

## ३८ वर्षीय फहीम खानवर जमाव जमवल्याचा ठपका; हिंसाचाराचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

औरंगजेबाची कबर हटविण्याच्या वादातून नागपूरमध्ये उसळलेली दंगलीचा मास्टरमाईंड या प्रश्नाचे उत्तर अखेर पोलिसांनीच दिले आहे. पोलिसांनी फहीम खान (वय ३८) नामक एका संशयिताचा फोटो प्रसिद्ध केला आहे. या फहीम खाननेच जमाव जमवून चिथावणी दिली असा दावा पोलिसांनी एफआयआरमध्ये केला आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल झाला असून पोलीसांनी त्याला अटकही केली आहे.

यााबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, फहीम खान नागपूरच्या यशोधरा नगरमधील संजय बाग परिसरातील रहिवासी आहे. त्याचे शिक्षण दहावीपर्यंतच झाले आहे. मात्र तो राजकारणात सक्रिय आहे. सध्या त्याच्याकडे मायनॉरिटीज डेमोक्रॅटिक पार्टीचे शहराध्यक्षपद आहे. त्याने याच पक्षाकडून नागपूरमधून २०२४ ची लोकसभेची निवडणूक देखील लढवली होती. पण भाजपचे उमेदवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्याचा ६.५ लाख मतांनी पराभव केला होता.



या घटनेत पोलिसांवरही दगडफेक झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या घटनेत ३४ पोलीस जखमी झाले. ५ नागरिकांना जबर मार लागला आणि ४५ वाहनांची तोडफोड करण्यात आली. तर काही वाहनेही जाळ्यात आली. याच घटनेत एका डीसीपींवर कुऱ्हाडीने वार करण्यात आल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी आतापर्यंत ५० हून अधिक जणांना ताब्यात घेतले आहे. यात फहीम खान याचाही समावेश आहे.

## एमपीएससी ची परीक्षा आता युपीएससी प्रमाणेच होणार, मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

### कुठलाही विरोध ग्राह्य धरणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

युपीएससीच्या धर्तीवर राज्यातील उपजिल्हाधिकारी, तहसीलदार ते तत्सम पदांच्या भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरतीप्रक्रिया राबविण्यात येते. मात्र, एमपीएससी मंडळाबाबत सातत्याने विद्यार्थ्यांमध्ये रोष पाहायला मिळतो, एमपीएससीची दिरंगाई आणि अधिकाऱ्यांमधील ताळमेळ नसल्याने विद्यार्थी आंदोलनाचं हत्यार उगारतात. तर, परीक्षांनंतर निकाल आणि नियुक्तीलाही एमपीएसीकडून तत्परता दिसून येत नसल्याचा आरोप होत असतो. त्यामुळेच, राज्यातील एमपीएससी संदर्भात आमदार शिवाजीराव गर्जेंकडून विधिमंडळात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देत महत्त्वाची घोषणा केली आहे. भविष्यात एमपीएससीमार्फत मोठी भरती करण्यात येणार आहे. तसेच, युपीएससी प्रमाणे एमपीएससीमध्ये देखील कॅलेंडर असेल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



युपीएससी प्रमाणे एमपीएससीमध्ये देखील कॅलेंडर असावे, असा आपला प्रयत्न असणार आहे. तसेच, एमपीएससी परीक्षा या वर्षापासून आपण डिस्क्रीप्टिव्ह स्वरुपात घेणार आहोत. अर्थातच, या प्रक्रियेला काहींचा विरोध आहे, मात्र आपण हा विरोध ग्राह्य धरणार नाही, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी एमपीएससी परीक्षेसंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली. एमपीएससी मंडळात ज्या रिकाम्या जागा आहेत, त्यापैकी एक जागा पूर्ण करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तर, उर्वरीत दोन जागांसंदर्भात आपण ड देतो आहोत, अशी माहितीही फडणवीस यांनी सभागृहात दिली. दरम्यान,अजित पवारांनी दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्र्यांना ह्या जागा भरण्यासंदर्भात पत्र दिले होते.

सगळ्या राज्यांचा आणि युपीएससी परीक्षांचा अभ्यास करण्यात आला आहे. अशात वर्ग ए दोन आणि तीन देखील आपण एमपीएससीला दिलेलं आहे. त्यातूनच, आपण एमपीएससीचं रिस्ट्रक्चरिंग करत आहोत.

## शेतकऱ्यांनी अरबी समुद्रात फेकलं सोयाबिन अन् ७/१२ उतारे; पोलिसांना चकवा, बोटीतून आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रमुख रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात बुलढाण्यातून शेतकऱ्यांच्या मोर्चा मुंबईच्या दिशेनं आला. मात्र, हा शेतकरी मोर्चा पोलिसांनी खालापूर येथे अडवून ठेवल्यानं, शेतकरी नेते रविकांत तुपकर आक्रमक झाले होते.




पोलिसांनी लाठीचार्ज केला, गोळ्या घातल्या तरी आपण मुंबईत जाणारच, असा निर्धार रविकांत तुपकर यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या जीवाला काही झाल्यास याला पोलीस आणि सरकार जबाबदार असल्याचे तुपकर यांनी म्हटले होते. मात्र, अखेर ते काही शेतकऱ्यांसह मुंबईत पोहोचलेच.तुपकर यांनी जाहीर केल्याप्रमाणे आज त्यांनी मुंबईत येऊन आंदोलन केले. १७ मार्चच्या सायंकाळीच पोलिसांनी रविकांत तुपकर यांचे घर आणि ऑफिसला वेढा टाकला होते. त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांना अर्ध्या रात्री झोपेतून उठवून पोलिसांकडून जबरदस्तीने धरपकड करण्यात आली.याही परिस्थितीत कर्जाचे सातबारे समुद्रात बुडवणारच म्हणत गनिमी पद्धतीने भूमिगत होत रविकांत तुपकर मुंबईत दाखल झाले आहेत. राज्यभरातील त्यांचे कार्यकर्ते देखील मुंबईत पोहोचले आहेत. मात्र, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं

एकीकडे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना खालापूर पोलिसांनी ताब्यात घेतलं असताना दुसरीकडे तुपकर यांचे समर्थक गमीनी काव्याने बोटीच्या माध्यमातून अरबी समुद्रात पोहोचले.

शेतकरी आंदोलकांनी राज्य सरकारच्या विरोधात घोषणा देत सोयाबीन, कापूस आणि सातबाऱ्याचे पेपर समुद्रात बुडवले, तसेच आपल्यासोबत आणलेला सोयाबिन देखील समुद्रात फेकून सरकारचा निषेध केला.

शेतकरी आंदोलकांनी राज्य सरकारच्या विरोधात घोषणा देत सोयाबीन, कापूस आणि सातबाऱ्याचे पेपर समुद्रात बुडवले, तसेच आपल्यासोबत आणलेला सोयाबिन देखील समुद्रात फेकून सरकारचा निषेध केला.सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार, शेतकऱ्यांचा संपूर्ण सातबारा कोरा करावा, कापूस व सोयाबीन प्रति क्विंटल तीन हजार रुपये भाव फरक द्यावा, अशी मुख्य मागणी क्रांतीकारी शेतकरी संघटनेची आहे.

## संपादकीय ......

# बांगला देशी घुसखोरांचे वास्तव्य

*नाशिकच्या मालेगावमध्ये किमान शंभर बांगला देशी घुसखोरांचे वास्तव्य, विदर्भातील अमरावती महापालिका क्षेत्रात सुमारे साडेचार हजार बांगला देशी आणि रोहिंगे आश्रयाला, नाशिकच्याच कळवणलगत एका खेड्यात १८१ मुस्लिम ग्रामस्थ पीएम किसान योजनेचे बोगस लाभार्थी, तीन आरोप वेगवेगळ्या तीन ठिकाणचे असले तरी ते करणारी व्यक्ती एकच आणि तिचा रोख प्रशासकीय व्यवस्थेवर असणे हे त्यामधील समान धागे आहेत. अनेकदा प्रशासकीय शैथिल्य गंभीर बाबीचे मूळ ठरून त्यावरून उद्भवणार्या परिणामांचा सामना करताना कारभार्यांच्या नाकीनऊ येते.*

*भाजप नेते किरीट सोमय्या यांनी उपरोल्लेखित आरोपांची पुराव्यांनिशी राळ उठवत प्रशासनाला भंडावून सोडले होते. चौकशीच्या सोपस्कारांत मालेगावमध्ये तीन हजारजणांना नोटिसा आणि १५ व्यक्तींविरोधात गुन्हे दाखल झाले असले तरी मूळ प्रश्न अनुत्तरित राहतो तो म्हणजे हे कथित घुसखोर त्या त्या ठिकाणी आश्रयाला आलेच कसे? हा संशयकल्लोळ आपल्यासोबत भावंडांप्रमाणे राहणार्या आणि घुसखोरांना मदतीचा हात देणार्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरू शकतो. गेल्या सहा महिन्यांत भारतात दोन लाख बांगला देशी घुसखोरांनी प्रवेश केल्याचा सोमय्या यांचा आरोप आहे. सोमय्या यांच्या लेखी घुसखोर बांगला देशींना भारतात स्थायिक करून घेण्यासाठी मोठी यंत्रणा कार्यरत आहेच; शिवाय त्यासाठी मोठ्या प्रमाणात फंडिंग केले जात आहे. यास्तव त्यांनी मालेगावचे उदाहरण समोर ठेवत येथील घुसखोरांच्या पुनर्वसनार्थ आर्थिक घोटाळ्यातील ३८९ कोटींची रसद पुरवल्याचा गंभीर आरोप केला. घुसखोरांच्या पुनर्वसनासाठी खोटी कागदपत्रे देऊन संबंधित व्यक्ती मालेगावमध्ये जन्मल्याचे प्रमाणपत्र बहाल करून स्थानिक प्रशासनाचा हातभार लागल्याचेही सोमय्या ठामपणे सांगतात. गेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान हा घोटाळा झाल्याचा तसेच घुसखोरांकडे बोगस रेशन कार्डे असल्याचेही सोमय्यांचे म्हणणे आहे. यामुळे देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, हे त्यांनी नमूद केले. सोमय्यांचे आरोप राजकीय मानले तरी राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनीही या मुद्द्यावर भाष्य करून जणू सोमय्यांच्या आरोपांची पुष्टी केल्याने वातावरण तापले आहे. घुसखोर बांगला देशींना कोलकात्याहून मदत होत असल्याचे कदम यांचे वक्तव्य दुर्लक्षून चालणार नाही.*

*विदर्भाच्या अमरावतीत मालेगावप्रमाणेच बांगला देशी आश्रयास आल्याचे सांगत सोमय्या यांनी तेथील आकडा साडेचार हजार व्यक्तींचा असल्याचे पोलिसांना दिलेल्या ४६८ पानी पुराव्यात स्पष्ट केले आहे. याहून गंभीर प्रकार नाशिकच्या कळवण तालुक्यातील भादवण येथे उघडकीस आला आहे. मूळ गावात एकही मुस्लिम कुटुंब नसताना तब्बल १८१ मुस्लिम व्यक्ती पंतप्रधान किसान सन्मान योजनेचे लाभार्थी असल्याची बाब सोमय्या यांनी जगजाहीर केली आहे. या सर्वांना योजनेचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर हे लाभार्थी नेमके कोण, याची पंचक्रोशीत चर्चा झाली. यामधील धक्कादायक गोष्ट म्हणजे या मुस्लिम कुटुंबांचे बँक खाते बांगला देश सीमावर्ती भागातील असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाले. स्थानिकांनी ही बाब प्रशासनाच्या नजरेत आणून देऊनही त्याकडे सपशेल दुर्लक्ष करण्यात आले. दस्तुरखुद्द सोमय्या यांनी स्थानिक तहसीलदारांवर प्रश्नांची सरबत्ती करूनही त्यांना केवळ टोलवाटोलवी अनुभवावी लागली.*

*प्रश्न मालेगाव, अमरावती किंवा कळवणमधील खेड्याचा नाहीच मुळी. बाह्य देशातून आलेले घुसखोर निर्ढावल्यासारखे आपल्याकडे येतात आणि बस्तान बसवतात, हे देशहिताच्या कोणत्याच चौकटीत बसत नाही. ही मंडळी इकडे पोहोचतातच कशी, याबाबत ना पोलिस खाते, ना प्रशासनाला मागमूस नसणे ही गंभीर बाब आहे. हा मुद्दा भाजप नेत्याने उपस्थित केला, हा वादाचा मुद्दा असू शकतो. तथापि, त्याची सविस्तर आणि उच्च पातळीवर चौकशी होणे गरजेचे आहे. एखाद्या ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी वास्तव्यास जाणे आणि बस्तान बसवणे सहजसोपे नाही. त्यासाठी कागदपत्रांसह आर्थिक बळाची गरज असताना शेकडोजण ही तजवीज कशी करतात, हा महद् सवाल आहे. यावर सरकारी स्तरावर काय पावले उचलली जातात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.*

# 'मतदार ओळखपत्र' आणि आधार कार्ड लिंक होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९नवी दिल्ली :-** मतदार ओळखपत्र लवकरच आधार कार्डाशी लिंक केले जाणार आहे. याबाबत केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे मतदार यादी अधिक पारदर्शक आणि अचूक होईल, तसेच बनावट मतदार ओळखणे सोपे होणार आहे. निवडणूक प्रक्रियेत अधिक विश्वासार्हता आणण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंह संधू आणि डॉ. विवेक जोशी यांनी नवी दिल्लीतील निर्वाचन सदन येथे एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, विधी विभागाचे सचिव, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव, यूआयडीएआयचे सीईओ आणि निवडणूक आयोगाचे तांत्रिक तज्ज्ञ उपस्थित होते.

बैठकीत ठरल्यानुसार मतदार ओळखपत्र आधार कार्डशी जोडण्याची प्रक्रिया संविधानाच्या अनुच्छेद ३२६ च्या तरतुदींनुसार होईल. यूआयडीएआय आणि निवडणूक आयोगाच्या तांत्रिक तज्ज्ञांमध्ये लवकरच पुढील चर्चा होईल असे ठरले.




या निर्णयामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक होईल, तसेच बनावट मतदार नोंदणी रोखली जाईल. यामुळे निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता वाढेल आणि मतदान अधिक पारदर्शक होईल.या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, विधी विभागाचे सचिव, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव, यूआयडीएआयचे सीईओ आणि निवडणूक आयोगाचे तांत्रिक तज्ज्ञ उपस्थित होते.

**बोगस मतदानाचा प्रश्न निकाली निघणार**

ग्रामपंचायत निवडणूकांपासून ते लोकसभा निवडणूकांपर्यंत बोगस मतदान होत असल्याचा आरोप विविध राजकीय नेत्यांकडून तसेच पक्षसंघटनांकडून सातत्याने होत आहे. मतदान ओळखपत्र हे आधार कार्डला लिंक झाल्यास बोगस मतदान, दुबार मतदार नावे या समस्यांना आळा बसेल. आधारला मतदान ओळखपत्र लिंक झाल्यास मतदाराला एकाच ठिकाणी मतदान करणे शक्य होईल, अन्यत्र मतदान करता येणार नाही. त्यामुळे १९५२च्या सार्वत्रिक निवडणूकांपासून बोगस मतदान समस्येचा भस्मासूर आपोआपच निकाली निघणे शक्य होणार असल्याचा दावा राजकीय विश्लेषक विजय घाटे यांनी केला आहे.

**मतदान ओळखपत्राला 'आधार' देण्याचे विधेयक डिसेंबर २०२१लाच मंजूर**

मतदान ओळखपत्राशी आधारकार्ड जोडण्याची तरतूद असलेले सुधारित निवडणूक कायदा विधेयक २० डिसेंबर २०२१ रोजी लोकसभेमध्ये मंजूर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी २१ डिसेंबर २०२१ रोजी राज्यसभेतही मंजूर झाले होते. लोकसभेच्या सभागृहामध्ये प्रचंड गदारोळामध्ये हे विधेयक आवाजी मतदानाने संमत झाले होते.

# तुमच्या सातबाऱ्यावर विहीर अन् बोअरवेलची नोंद घरबसल्या करा, अशी आहे प्रक्रिया

**दि.१९नवी विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रात विहीर किंवा बोअरवेलची नोंद करण्यासाठी, ई-पीक पाहणी प किंवा वर्लो.ारहर्लेीर.सेंी.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन ( अर्ज करता येतो. या पमधून शेतकरी आपल्या शेतातील विहीर, बोअरवेल, झाडांची नोंद करू शकतात. यामुळे शेतकऱ्यांचे तलाठी कार्यालयातील हेलपाटे कमी होणार आहेत.

अनेक शेतकऱ्यांना आपल्या जमिनीतील विहीर किंवा बोअरवेलची नोंद सातबाऱ्यावर करायची असते. मात्र नोंद नेमकी कुठे करायची, हेच कळत नाही. मात्र आता शेतकऱ्यांना घरबसल्या नोंद करता येणार आहे. ई पीक पाहणीच्या माध्यमातून ही नोंद केली जात आहे.

ना लेखी अर्ज, ना शुक्ल ई-पीक पाहणी पद्वारे शेतकरी आपल्या शेतातूनच बोअरवेल, विहीर, झाडे यांची नोंद करू शकणार आहेत. यासाठी शेतकऱ्यांना कोणताही लेखी अर्ज, तसेच शुक्ल भरण्याची गरज नाही. अगदी मोफत आणि विशेष म्हणजे शेतातूनच ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.







अशी आहे सोपी प्रक्रिया बॉक्स टाकणे मागे


सर्वप्रथम ई पीक पाहणी हे प आपल्या मोबाईलद्वारे डाऊनलोड करा.


अँप इन्स्टॉल झाल्यानंतर खातेदाराचे नाव निवडायचा आहे.

खाते नंबर टाकायचा आहे. त्यानंतर 'कायमपड/ चालू पड असा पर्याय येईल.

यानंतर खाते क्रमांक निवडायचा आहे.

कायम आणि चालू पड प्रकार निवडा. यानंतर अनेक पर्याय दिसून येतील, यातील हवा असलेला पर्याय निवडा.




बोअरवेल करिता कूपनलिका पड हा पर्याय निवडा.

संबंधित बोअरवेल किंवा विहिरीचे फोटो अपलोड करायचे आहेत.

ई-पीक पाहणीद्वारे नोंदविलेल्या माहिती बाबत व इतर नोंदीबाबत आज्ञावलीमध्ये स्वयं घोषणापत्र घेतले जाणार आहे. त्यावर क्लिक करून सबमिट करा.




## नियमितपणे ताक पिण्याचे फायदे वजन कमी होण्यासोबतच मिळतील ८ जबरदस्त फायदे- सौंदर्यही खुलेल

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक –**

नियमितपणे ताक पिणे आरोग्यासाठी कसे फायदेशीर ठरते, याविषयी माहिती सांगणारा व्हिडिओ आयुर्वेदतज्ज्ञांनी या इन्स्टाग्राम पेजवर शेअर केला आहे. यामध्ये त्यांनी ताक पिण्याचे सांगितलेले फायदे पुढीलप्रमाणे..




१. ताक प्यायल्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

२. ताकामधून चांगल्या प्रमाणात व्हिटॅमिन बी १२ तसेच कॅल्शियम मिळते.

३. शाकाहारी लोकांसाठी ताक हा प्रोटीन्सचा खूप चांगला स्त्रोत मानला जातो.

४. हिरड्या बळकट होण्यासाठी तसेच हिरड्यांमधून रक्त येत असेल तर तो त्रास कमी करण्यासाठीही ताक पिणे फायदेशीर ठरते. वारंवार तोंड येत असेल तर काही दिवस ताकाच्या गुळण्या करून पाहा. बरं वाटेल.

५. डोक्यातला वाढता कोंडा कमी करण्यासाठीही ताक उपयुक्त ठरते. तुमच्या रोजच्या जेवणात तर ताक घ्याच, पण आठवड्यातून एकदा डोक्यालाही लावा. कोंडा कमी होईल.

६. त्वचा अधिक चांगली, नितळ आणि तरुण राहण्यासाठीही ताक पिणे उपयुक्त ठरते.

७. खूप गळून गेला असाल, थकवा येऊन अशक्तपणा जाणवत असेल तर ग्लासभर ताक प्या. लगेच एनर्जी येईल.

८. मुळव्याधीचा त्रास असणाऱ्यांनाही ताक पिणं फायदेशीर ठरतं.

# आरटीई : प्रतीक्षा यादीतील मुलांच्या प्रवेशाला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**

आरटीईअंतर्गत खासगी शाळांमध्ये राखीव असणाऱ्या २५ टक्के जागांवर जिल्ह्यातील १ हजार ६५४ बालकांचे प्रवेश झाले तर ७४४ जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांवर आता प्रतीक्षा यादीतील मुलांना प्रवेश देण्याला मंगळवारपासून (१८ मार्च) सुरुवात झाली आहे, अशी माहिती शिक्षण विभागाने दिली.२०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता आरटीई प्रवेशाला १४ फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला. २८ फेब्रुवारीपर्यंत हे प्रवेश स्वीकारले जाणार होते. मात्र,




याला १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली.तालुकास्तरीय समितीकडूनकागदपत्रांची पडताळणी करून त्यांच्या शिफारशीनंतरच संबंधित शाळेत पाल्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले. परंतु मुदतीअंती सोडतीतील अनेक बालकांचे प्रवेश होऊ शकले नाहीत. जिल्ह्यात २२५ शाळांमध्ये २४३० जागांसाठी आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. जिल्ह्यात ८१४१ प्रवेश अर्ज प्राप्त झाले. सोडतनंतर पहिल्या टप्प्यात २३९६ विद्यार्थ्यांची यादी घोषित केली. या मुलांना प्रवेश निश्चितीबाबत मेसेजही प्राप्त झाले. त्यानंतर पडताळणी समितीकडे कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. या कालावधीत २३९६ पैकी केवळ १६५४ पाल्यांचेच प्रवेश निश्चित झालेत.-

# महाराष्ट्राच्या वातावरणात होणार मोठा बदल

## विदर्भात अकोला आणि अमरावती वगळता सर्वच जिल्ह्यामध्ये पावसाचा यलो अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** राज्यातील हवामानात मोठा बदल झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून कडाक्याचे ऊन पडत आहे, आता पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने विदर्भातील काही जिल्ह्यांत आज पावसाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उर्वरित महाराष्ट्रात तापमानाचा पारा वाढण्याची शक्यता आहे. मुंबई, पुण्यासह सोलापूर, नाशिक आणि कोकणात उन्हाची झळ लागण्याची शक्यता आहे.महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात पुढील तीन दिवस पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात अकोला आणि अमरावती वगळता सर्वच जिल्ह्यामध्ये पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा आणि गारपीटीचा इशारा देण्यात आला आहे. पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होऊ शकते.अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे वातावरणात मोठा बदल झाला आहे. पुढील तीन दिवस राज्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. वर्धा , गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे.गेल्या




काही दिवसांत राज्यात कडाक्याचे उन पडत आहे. अनेक जिल्ह्यातील तापनाम ४० अंशाच्या पुढे गेले आहे. उन्हामुळे आरोग्यावर परिणाम होत आहे, त्यातच आता काही जिल्ह्यात अवकाळीचा इशारा देण्यात आला आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १९ मार्च २०२५ — शहर/ग्रामिण


# चार तालुक्यातील नायब तहसीलदारांनी दिलेले जन्म दाखले रद्द

## पाच हजार जन्म प्रमाणपत्रांची पुनर्तपासणी होणार

### प्रमाणपत्र नव्याने दिली जाणार- जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

राज्याच्या महसूल व वन मंत्रालयाने सर्व विभागीय आयुक्त, जिल्हादंडाधिकाऱ्यांना पुढील आदेशापर्यंत विलंबित जन्म दाखले व मृत्यू दाखले देण्याची प्रक्रिया पुढे ढकलण्याचे निर्देश दिल होते. विलंबाने जन्म-मृत्यू दाखले देण्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता घडल्याच्या तक्रारी सरकारकडे येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर तहसीलदार या पदापेक्षा कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेली प्रमाणपत्रे रद्द करण्यात यावीत आणि अशा प्रमाणपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पुनर्तपासणी करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी सूचना राज्य सरकारकडून प्राप्त झाल्यानंतर अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्ह्यातील ४ तहसीलमधील नायब तहसीलदारांनी दिलेले सर्व विलंबित जन्म दाखले रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत. अमरावती, नांदगाव खंडेश्वर, अचलपूर आणि चिखलदरा तहसील कार्यालयातील नायब तहसीलदारांनी दिलेले विलंबित जन्म नाकारण्याचा दाखले निर्णय अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी घेतला आहे. या वादग्रस्तकालावधीत अमरावती तहसील कार्यालयातून २८२३, नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयातून २७१, अचलपूर तहसील कार्यालयातून २,५२७ आणि चिखलदरा तहसील कार्यालयातून १ विलंबित जन्म दाखला देण्यात आलेला आहे. त्यापैकी बहुतांश दाखले नायब तहसीलदार स्तरावरील अधिकारीच देतात. ती फेटाळल्याने



आता सर्व प्रमाणपत्रे आणि त्यासाठी सादर केलेले अर्ज व कागदपत्रे यांची फेरतपासणी करून अशा प्रकरणांमध्ये लवकरच योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात बांगलादेशी आणि रोहिंग्या बेकायदेशीरपणे स्थायिक झाल्याचा आरोप केला होता. ज्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीरपणे विलंबित जन्म दाखलेही मिळवले आहेत. त्यामुळे अशा सर्व प्रकरणांची काटेकोरपणे चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली होती. अकोला जिल्ह्यातील नायब तहसीलदारांनी दिलेले विलंबित जन्म दाखले रद्द केल्याची माहिती देताना अमरावतीचे जिल्हादंडाधिकारी याबाबत सहकार्याची वृत्ती बाळगत नसल्याचा आरोपही केल होता. मात्र आता राज्य शासनाच् महसूल व वन विभागाने या संदभा आदेश जारी केल्याने अमरावत जिल्हाधिकारी यांनी जन्म प्रमाण रद्द करण्याची कार्यवाही केली जिल्ह्यातील चार तालुक्यातून दे आलेले दाखले नाकारण्याचे देण्यात आले असून अशा प्रकरणांची फेरचौकशी करून ये कारवाई करण्याच्या सूचना तहसीलदार व उपविभागीय दंड यांना देण्यात आल्या आहेत.

# २१ मार्चला मनपाचे बजेट सादर होणार

## बजेटमध्ये उत्पन्न व खर्चाचा समतोल साधणार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती–** अमरावती महापालिकेच्या सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पाची तयारी आता जवळपास पूर्ण झाली आहे. यानुसार येत्या शुक्रवार २१ मार्च रोजी मनपाचे सन २०२५ २०२६ चा अर्थसंकल्प सादर करणार, अशी माहिती मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिली. विशेष म्हणजे बजेटच्या अनुषंगाने आतापर्यंत महत्वपूर्ण चार-पाच बैठका पार पडल्या. तसेच सर्व तांत्रिकबाबी पूर्ण झाल्या आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा या वर्षीचे बजेट कमी राहण्यांची शक्यता आहे. या बजेटमध्येमनपाचे उत्पन्न आणिखर्चाचा योग्य तो समतोल साधण्यात येईल, असे ते म्हणाले.

**आव्हानात्मक, पण समतोल साधणार**

आगामी वर्षाचे बजेट मांडताना आयुक्त सचिन कलंत्रे यांच्यासमोर मोठी गुंतागुंत आणि आव्हान आहे. कारण मनपाची कमाई २५ पैसे आहे आणि त्यांना दीड रुपये खर्च करावे लागत आहे: सर्व कसे शक्य होईल ? महानगरपालिकेचा कारभार कसा चालेल? असे एक ना अनेक प्रश्न पडले आहे. मात्र असे असले तरी कोणतीही आकडेवारी अधिक न वाढविता, मनपाचे उत्पन्न आणिमनपाचा खर्चयांचा योग्य तो समतोल राखून स्थिर, पण गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी बजेट सादर करण्यात येईल, असे मनपा आयुक्तांनी सांगितले.

**हेड कमी करणार**

बजेट वाढवून मांडण्यात येणार नाही.वस्तुनिष्ठ, स्थिर बजेट राहणार असून विशेषत: हेड वाढविण्यात येणार नाही, उलट कमी करण्यात येईल. सर्वात महत्वाचे म्हणजे वार्ड विकास व स्वेच्छा निधीबाबतया बजेटमध्ये आयुक्त कठोर निर्णय घेण्याची शक्यता आहे.

**मागील बजेट १०६९.८२ रुपयांचे**

२०२४-२५ या वर्षासाठी तत्कालीन महापालिका आयुक्त देविदास पवार यांनी १०६९.८२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला होता. यामध्ये, सर्वबाबींमधून महानगर पालिकेला ४७२.४९ कोटी रुपयेमहसूल उत्पन्न मिळाले.तर भांडवली उत्पन्न ४३८.४२ कोटी रुपये आणि असाधारण ऋण व निलंबन रक्कम १४.८० कोटी रुपयेअसल्याचे सांगण्यात आले.

महापालिकेला एकूण ९२५.४२ कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे.

### जिल्हा बँकेच्या संचालक पदाच्या अपात्रतेचे प्रकरण

# बच्चू कडू यांच्या शिक्षेलाच उच्च न्यायालयाची स्थगिती

### आता सुनावणी निरर्थक, विरोधकांना मोठा धक्का
### विभागीय सहनिबंकासमोरील सुनावणी ही टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती** : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे राजकारण पुन्हा एकदा विरोधकांसाठी धक्कादायक वळणावर पोहोचले आहे. बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना न्यायालयाने शिक्षा ठोठावल्याने त्यांना अपात्र ठरवावे, अशी याचिका विरोधकांनी दाखल केली होती. त्यानंतर बँकेचे अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडू यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र करण्याकरिता विभागीय सहनिबंधकांनी नोटिस बजाविली होती. १८ मार्चपर्यंत त्यांना प्रत्यक्ष हजर राहून उत्तर देण्याचे निर्देशही दिले होते. मात्र ज्या प्रकरणावरून हे राजकारण तापले, त्या शिक्षेलाच बच्चू कडू यांनी मुंबई उच्च न्यायालयातून स्थगिती मिळवली आहे. त्यामुळे आता ही सुनावणी निरर्थक झाली - असून विरोधकांना मोठा धक्का बसलेला आहे. उल्लेखनीय म्हणजे मंगळवारी या




संदर्भात सुनावणी असताना योगायोगाने विभागीय सहनिबंधक रजेवर गेल्याने सदरची सुनावणी देखील टळली आणि इकडे हायकोर्टानी दिलासा दिला..

जिल्हा मध्यवर्ती बँकेत सत्तासंघर्ष चांगलाच पेटला आहे. बबलू देशमुख गटातील संचालक हरीभाऊ मोहोड यांच्यासह ११ संचालकांनी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र करण्याबाबतची याचिका दाखल केली. नाशिक जिल्हा न्यायालयाने त्यांना एका प्रकरणात एका वर्षाची शिक्षा ठोठावली असल्याचा दाखला त्यांनी यामध्ये दिला आहे.एक वर्षापेक्षा अधिक शिक्षा लागलेले संचालक हे या पदाकरिता अपात्र ठरतात अशी बँकेच्या उपविधीत तदतूद असल्याने या नियमांचा आधार घेत विभागीय सहनिबंधक यांनी आपणात अपात्र का करण्यात येऊ नये, अशी नोटिस ७ फेब्रुवारीच्या पत्रान्वेदिली. याकरिता बच्चु कडू यांना सोमवार, २४ फेब्रुवारी, रोजी दुपारी ३ वाजता साक्ष नोंदविण्याकरिता समक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे, असे सुचविले होते. मात्र सुनावणीदरम्यान त्यांनी १० मार्च पर्यंत बाजु मांडण्याकरिता मुदत मागितली असता. त्यांची ही मागणी मान्य करीत विभागीय सहनिबंधकांनी त्यांना १० मार्चपर्यंत मुदतवाढ देत अपात्रतेबाबतचा खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. परंतु त्यांना आणखी मुदतवाढीची अपेक्षा असल्याने अखेर त्यांनी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायालयाने त्यांना शेवटची संधी देत आठ दिवसांची म्हणजे मंगळवारी १८ मार्च पर्यंतआपली बाजु मांडण्या करिता मुदत दिली ही सुनावणी अंतिम असल्याचे आदेशही दिल्याने याकडे सर्वांचे लक्ष लागले होते, मुदत वाढीचा लाभ घेत या आठ दिवसातच बच्चू कडूंनी मुंबई उच्च न्यायालयात त्यांच्यावर लागलेल्या शिक्षे विरोधात याचिका दाखल करून स्थगिती मिळवण्याकरिता प्रयत्न सुरू केले. सोमवारी यावर सुनावनी होऊन त्यांच्या शिक्षेला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली त्यामुळे विरोधकांना मोठा धक्का बसलेला आहे, कारण या स्थितीमुळे अपात्र ते संदर्भात प्रकरण आता निष्पळझालेले आहेत.

**विरोधकांचा डाव फसला**

दिव्यांगाच्या विविध मागण्यासाठी आंदोलन केले तेव्हा गुन्हे दाखल होवून न्यायालयाने शिक्षा सुनावली होती. आम्ही एका चांगल्या कामासाठी आंदोलन केले. पण, विरोधकांना याचा गैरफायदा घेत अपात्र करण्यात यावे, अशी याचिका दाखल केली. मात्रहायकोर्टाने आम्हाला स्थगिती दिली आहे, विरोधकांचा डाव फसला आहे.

**– बच्चू कडू, अध्यक्ष जिल्हा बँक**

**अन्यथा बच्चू कडू अपात्र झाले असते**

बच्चू कडू यांना अपात्र करण्याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्याकरता उच्च न्यायालयाने १८ मार्चशेवटची सुनावणी घेण्याबाबतचे आदेश दिले होते, मंगळवारी १८ मार्च रोजी सुनावणी झाली असती बच्चू कडू हे संचालक पदावरून अपात्रझाले असते हे निश्चित, परंतुबच्चूकड्यांना मुंबई उच्च न्यायालयाचा स्थगिती वरील आदेश अप्राप्त असल्याने त्यांना आज सुनावणी दरम्यान तो सादर करता आला नसता, परंतु योगायोगाने ऐनवेळी विभागीय सहनिबंधक हे रजेवर गेल्याने सुनावणीस टळली आणि बच्चू कडू नशीबवान ठरले त्यामुळे बुधवार पर्यंत त्यांनी आदेश विभागीय सहनिबंधकाला दिल्यास सुनावणीचा काहीच अर्थ राहणार नाही हे मात्र निश्चित, विभागीय सहनिबंधकांची रजा योगायोग होती की आणखी काही अशी चर्चा आता सहकार क्षेत्रात सुरू झाली आहे.

# वैद्यकीय पदव्युत्तर पदवी प्रवेश १५ जूनला नीट पीजी २०२५ परीक्षा

### संगणक आधारित चाचणी पद्धतीने दोन सत्रात होणार, यावर्षी ७५ हजार जागा उपलब्ध होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती–** राष्ट्रीय वैद्यकीय परीक्षा मंडळ म्हणजेच नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनिशन इन मेडिकल सायेन्सेस तर्फे विविध परीक्षा घेतल्या जातात. आता पदव्युत्तर पदवीसाठी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट पीजी २०२५ या परीक्षेची तयारी सूरू झाली आहे. ही नीट पीजी परीक्षा संगणक आधारित चाचणी पद्धतीने दोन सत्रात होत आहे.

ही महत्वाची समजल्या जाणारी परीक्षा १५ जून २०२५ रोजी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या दिवशी रविवार आहे. वैद्यकीय क्षेत्रात ही महत्वाची पात्रता परीक्षा असल्याने देशभरातून लाखो विद्यार्थी यासाठी अर्ज करतात. राष्ट्रीय मंडळ लवकरच सदर परीक्षेसाठी अधिकृत माहिती देणारे बुलेटिन प्रसिद्ध करणार असल्याचे सांगण्यात येते. त्यात नोंदणीची तारीख, पात्रता, अर्ज प्रक्रिया, परीक्षा नमुना आदी तपशील नमूद केला असेल. या नीट पीजी साठी ठराविक अभ्यासक्रम राहणार. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया या सर्वोच्च संस्थेने निश्चित केलेल्या पदवीधर वैद्यकीय शिक्षण नियमावर आधारित त्यात शरीरशास्त्र, शरीर क्रियाविज्ञान, जैव रसायनशास्त्र, स्त्रीरोग, बालरोग, त्वचाविज्ञान, रेडिओलोजी, या सारख्या विषयांचा समावेश राहणार.परीक्षेनंतर ५० टक्के अखिल भारतीय कोटा यातील जागासाठी वैद्यकीय समुपदेशन समिती मार्फत समुपदेशन करण्यात येईल. उर्वरित ५० टक्के सिट्स



साठी अपेक्षित समुपदेशन संबंधित राज्यांच्या समुपदेशन समितीकडून होणार आहे. देशातील एमडी, एमएस आणि पीजी डिप्लोमा या सारख्या पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी ही नीट पीजी परीक्षा अनिवार्य ठरते. एमबीबीएस पदवी घेतल्यानंतर सर्वच वैद्यकीय विद्यार्थ्यांना या पीजी पदवीचे वेध लागतात. कारण पीजी असल्याशिवाय शासकीय, खाजगी महाविद्यालये तसेच शासकीय आरोग्य सेवा आणि स्पेशल वैद्यकीय सेवेत प्रवेश मिळत नाहीच केवळ वैद्यकीय पदवी पुरेशी नसते. विदेशी प्रॅक्टिस तसेच वैद्यकीय संशोधन करण्यास पीजी आवश्यक आहे.वैद्यकीय क्षेत्रातील माहितीनुसार २०२४ मध्ये देशात पदव्युत्तरच्या ७३ हजार जागा उपलब्ध होत्या. २०२३ पेक्षा त्या ४ हजारपेक्षा अधिकने वाढल्या. यावर्षी ७५ हजार जागा उपलब्ध होणार असल्याची माहिती दिल्या जाते. डिप्लोमा ऑफ नॅशनल बोर्ड, डॉक्टरेट ऑफ नॅशनल बोर्ड साठी ही परीक्षा महत्वाची मानल्या जात असते. सरकारी तसेच खाजगी वैद्यकीय संस्थेत ही पदवी आता सेवेस अनिवार्य ठरली आहे. गतवर्षी या परीक्षेस २ लाख १६ हजार विद्यार्थी बसले होते.

# संतापजनक! नागपूर राड्यावेळी महिला पोलिसाचा विनयभंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर–**

औरंगजेबाच्या कबरीवरुन पेटलेल्या वादामुळे सोमवारी संध्याकाळी हिंसक वळण घेतलं. नागपुरात दोन गटांमध्ये दगडफेक झाली, त्याचे पडसाद मंगळवारी विधानसभेतही उमटले. दोन गटामध्ये राडा सुरू असतानाच अंधाराचा फायदा घेत महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एकीकडे दंगल सुरू असतानाच काही समाजकंटकांनी महिलेवर अत्याचार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे.



माणुसकी शिल्लक आहे की नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे.सोमवारी रात्री नागपूरमध्ये दंगल घडली होती, शहरातील काही भागात तणावाचे वातावरण होते. याच वेळी अंधाराचा फायदा घेत महिलेचा विनयभंग करण्यात आल्याची दुर्दैवी घटना समोर आली. एकीकडे भावना दुखावल्या म्हणून आक्रोश सुरू असताना मात्र दुसरीकडे कर्तव्य बजावणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यावर अशा पद्धतीचा हल्ला करणे हे काळी फासणारे आहे.

नागपूर मध्ये येथे सोमवारी रात्री दंगल भडकली. त्यावेळी कर्तव्यावर असणाऱ्या महिला पोलिसाची वर्दी खेचण्याचा प्रयत्न जमावाने केल्याची घटना घडली. याप्रकरणी गणेश पेठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. भावना दुखावल्या म्हणून आक्रोश सुरू असतानाच महिला पोलिसाला विवस्त्र करण्याचा प्रयत्न झाला. दरम्यान, सोमवारी रात्री झालेल्या दंगली दरम्यानचे अनेक व्हिडिओ समोर आले आहे. त्यामध्ये अश्लील शिवीगाळ दिसून येते.

दरम्यान, कीर्ती क्षीरसागर नावाची महिला केयरटेकरचे काम करते. तिलाही या जमावाने कशा पद्धतीने मारहाण केली याची आपबीती त्या महिलेने साम टीव्हीशी बोलताना सांगितली. एकीकडे भावना दुखावल्या म्हणून आक्रोश करायचा अन् दुसरीकडे महिलांच्या अब्रूवर हात टाकायचा, यामुळे नागपूरमध्ये संतप्त भावना उमटत आहेत.

# प्रिया विघ्ने यांच्याकडे प्रभारी अध्यक्षाचा पदभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९तिवसा** – स्थानिक तिवसा नगरपंचायतचे नगराध्यक्ष योगेश वानखडे यांच्या राजीनाम्यानंतर आता नुकताच उपाध्यक्ष प्रिया नरेंद्र विघ्ने यांच्याकडे अध्यक्षपदाचा पदभार देण्यात आला असून, मंगळवार (ता. १८) नगरपंचायतच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार त्यांनी पदाची सुत्रे स्वीकारली. यावेळी माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले.



योगेश वानखडे यांच्या अडीच वर्षाचा नगराध्यक्षपदाचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने त्यांनी दि. ११ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे आपला राजीनामा सोपविला होता. त्यामुळे आठ दिवसापासूनसभागृहाचे अध्यक्षपद रिक्त असल्यामुळे नगरपंचायतचे मुख्याधिकारी शिवदास मुसळे यांच्या उपस्थितीमध्ये प्रिया नरेंद विघ्ने यांना प्रभारी अध्यक्ष म्हणून पदभार देण्यात आला. नव्या अध्यक्षाची निवड होईपर्यंत त्या अध्यक्ष म्हणून कामकाज पाहणार आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चौथे पी. ए. आता आमदार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८वर्धा : –** महाराष्ट्र भाजपातील सध्या सर्वात शक्तिमान नेते म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाहिल्या जाते. २०१४ मध्ये मुख्यमंत्री, नंतर उपमुख्यमंत्री व आता परत मुख्यमंत्री अशी फडणवीस यांची राजकीय वाटचाल आहे. या वाटचालीत त्यांनी असंख्य सहकारी जोडले. त्यांना राजकीय सत्तासोपान पण चढण्यास मदत केली. मात्र, खरे भाग्यवान राहले ते त्यांचे अत्यंत विश्वासू मानल्या जाणारे पी. ए. खास गोटातील हे सहकारी फडणवीस यांचा विश्वास संपादन करीत अखेर आमदार पण झाले.आगामी विधान परिषद निवडणुकीत भाजपतर्फे उमेदवारी मिळालेले संदीप जोशी हे असे एक भाग्यवान म्हटल्या जातात. ते फडणवीस यांचे विश्वासू तर आहेच पण सुमित वानखेडे हे सक्रिय राजकारणात उतरल्यावर जोशी हेच फडणवीस कार्यालयात ओएसडी म्हणून नियुक्त झाल्याची आठवण काढल्या जाते. यापूर्वी त्यांना विधान



परिषद निवडणूक लढण्याची संधी मिळाली होती. पण ते पराभूत झालेत. आता मात्र ते नक्की आमदार होणार. फडणवीस यांचे आमदार होणारे सर्वात पहिले पी. ए. म्हणजे अभिमन्यू पवार. ते लातूर जिल्ह्यातील औसा मतदारसंघातून आमदार झालेत. ते पण फडणवीस यांचे स्वीय सचिव राहून चुकले.फडणवीस यांचे सर्वात चर्चेत राहलेले पी. ए. म्हणजे सुमित वानखेडे. त्यांना आर्वी मतदारसंघातून भाजपतर्फे उमेदवारी मिळाली आणि गदारोळ उडाला. कारण त्यावेळी आमदार असलेले दादाराव केचे यांची तिकीट कापून वानखेडे यांना उमेदवारी मिळाली. संतप्त केचे बंडखोरीचा झेंडा उभा केला. ही बाब अडचणीची ठरू शकते म्हणून केचे यांना गृहमंत्री अमित शहा यांच्या दरबारात हजर करण्यात आले होते. शब्द मिळाला आणि आता तिकीट मिळाल्याने तो खरा ठरला. पण या एकाच घटनेने सुमित वानखेडे यांची ताकद दिसून आली. सुमितसाठी काही पण, असे म्हटल्या गेले. वानखेडे आमदार झाले आणि फडणवीस यांचा जीव भांड्यात पडला, अशी प्रतिक्रिया प्रकटली. चौथे आमदार म्हणजे श्रीकांत भारतीय. ते विधान परिषदेवर निवडून आले आहे. फडणवीस हे २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाले तेव्हा भारतीय यांची मुख्यमंत्री कार्यालयात ओएसडी म्हणून नेमणूक झाल्याचे भाजप नेते अविनाश देव हे सांगतात. भारतीय हे विद्यार्थी परिषदेतून पुढे आले आहेत. या संघटनेचे संघटन सचिव व पुढे भाजपचे प्रदेश सचिव अशी पदे त्यांनी भूषविली. फडणवीस यांच्या सोबत सावलीसारखे वावरणारे हे चार आमदार झालेत. संदीप जोशी हे संभाव्य तर भारतीय हे विधान परिषदेवर तर सुमित वानखेडे व अभिमन्यू पवार हे विधान सभेत आमदार म्हणून पोहचले आहेत.

# प्रत्येकाने सजग राहून ग्राहक चळवळ सशक्त करावी–जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती–** प्रत्येक नागरिक हा ग्राहक आहे. त्यामुळे खरेदी करताना उत्पादनांबाबत चुकीची माहिती देत असल्यास ग्राहकांना असलेल्या अधिकाराचा उपयोग करावा. प्रत्येक नागरिकांने याबाबत सजग राहून ग्राहक चळवळ सशक्त करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. पुरवठा विभागातर्फे आज बचत भवनात जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा करण्यात आला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी विवेक जाधव, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, तहसिलदार प्रज्वल पाथरे, विधी अधिकारी श्री. बोहरा, अन्न धान्य वितरण अधिकारी श्री. राऊत, अखिल भारतीय ग्राहक पंचायत संघटन मंत्री अजय गाडे, अशोक हांडे, चारूदत्त चौधरी आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, ग्राहकांना सशक्त करण्यासाठी कायदा करण्यात आला आहे. याची जाणीव प्रत्येकाला होणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्राहकांना भ्रमित करणाऱ्या आणि गैरसमज पसरविणाऱ्या बाबींना आळा घालणे गरजेचे आहे. यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती होणे आवश्यक आहे. ग्राहकांना तक्रार करण्यासाठी आणि न्याय मिळविण्यासाठी विविध स्तरावर यंत्रणा उभारण्यात आली आहे. नागरिकांनी त्यांचा अधिकारीचा उपयोग केल्यास निश्चितच भेसळ, कमी दर्जाच्या उत्पादनांना आळा घालणे शक्य होईल. आज सायबर फसवणुकीचे गुन्हे वाढत आहे. यात प्रामुख्याने पैशाशी संबंधित गैरव्यवहार होत आहे. याबाबत स्थानिक स्तरावर नियंत्रण करणे शक्य नाही, मात्र नागरिकांनी काही



पथ्ये पाळल्यास सायबर गुन्हेगारांपासून सुरक्षित राहू शकणार आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी दक्ष राहून आपल्या परिसरात काय घडत आहे, याची जाणिव ठेवावी. शासकीय यंत्रणा त्यांच्या पद्धतीने काम करीत आहे, मात्र प्रत्येक नागरिकाने लक्ष ठेवल्यास फसवणुकीच्या प्रकारापासून दूर राहण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. श्री. जाधव यांनी चळवळीनंतर १९८६ मध्ये ग्राहक हिताचा कायदा करण्यात आला आहे. या कायद्याची जागृती झाल्यास चळवळ यशस्वी होणार आहे. ग्राहकांना कायद्याचे संरक्षण प्राप्त होण्यासाठी वस्तूंच्या खरेदी पावती जपून वापरावी. वस्तूंमध्ये काही दोष आढळल्यास याच पावतीच्या आधारे ग्राहकांना मिळणारे संरक्षण प्राप्त होऊ शकेल. ई-कॉमर्स वेबसाईटवरून खरेदी करण्याची पद्धत रूढ होत आहे. यात प्रामुख्याने परदेशी मालाची विक्री होताना दिसून येते. त्यामुळे दुसऱ्या देशाचे आर्थिक मांडलिकत्व पत्करावे लागत असल्याने अशा खरेदीपासून नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले. यावेळी अजय गाडे, चारूदत्त चौधरी, अशोक हांडे यांनी ग्राहकांना असलेल्या हक्काबाबत माहिती दिली. शिवम पथनाट्यच्या चमूने ग्राहक जनजागृतीबाबत पथनाट्य सादर केले.

# राज्यातील ६ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या; नागपूर, संभाजीनगर, जळगाव, नांदेड, पालघरमधील अधिकारी बदलले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९मुंबई–** राज्यातील सहा आयएएस अधिकाऱ्यांच्या आज बदल्या करण्यात आल्या आहेत. नागपूरच्या अतिरिक्त आयुक्तांना मुंबईत बढती देण्यात आली असून आंचल गोयल यांना मुंबईच्या जिल्हाधिकारीपदी संधी देण्यात आली आहे. नागपूरच्या अतिरिक्त महापालिका आयुक्तांची बदली करण्यात आली आहे.

राज्यातील सहा आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. नागपूर, जळगाव, नांदेड, पालघर आणि गडचिरोलीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. जळगाव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांची छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदावर बदली करण्यात आली आहे.रणजित मोहन यादव सहाय्यक जिल्हाधिकारी, कुरखेडा




उपविभाग, गडचिरोली यांना प्रकल्प अधिकारी, आयटीडीपी, गडचिरोली येथे आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, गडचिरोली येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

करिश्मा नायर प्रकल्प संचालक यांची नाशिक महानगरपालिका, नाशिक येथे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कवली मेघना यांची जिल्हा परिषद, नांदेड येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.आंचल गोयल यांची मुंबई शहर, मुंबई येथे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.अंकित यांची छत्रपती संभाजी नगर येथे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.मीनल करनवाल यांची जिल्हा परिषद, जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# काँग्रेसची धामणगाव तहसील कार्यालयावर धडक

## महाराष्ट्रामध्ये धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर कारवाईची केली मागणी

### शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर काँग्रेस आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ धामणगाव रेल्वे–** तालुका काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी,कार्यकर्ते,शेतकरी व आदींनी तहसील कार्यालयावर धडक देत तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना शेतकऱ्यांच्या पिकाला भाव,महाराष्ट्रामध्ये धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या सात दिवसात करावी.यासह आदी मांगण्याचे निवेदन तहसीलदार अभय घोरपडे यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की,आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या हातात आलेले पीक कसेबसे विकून दोन पैसे मिळवण्याच्या बेतात असतानाच सोयाबीनची शासकीय खरेदी बंद केली. तसेच नाफेड मार्फत चण्याची नोंदणी सुरू न करता शेतकऱ्याच्या तोंडाला पाणी पुसली आहे. यावर्षी सोयाबीनला, कपाशीला ,तुरीला ,भाव नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे शासनाची कोणते प्रकारची मदत नसून शेतकऱ्यांचे मत घेण्यासाठी सत्तेत येण्याआधी भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांचे कर्जमाफी करू अशी घोषणा करून सत्तेत आले त्याचा सुद्धा विसर या सरकारला पडला आहे यातच महाराष्ट्रात विविध प्रश्नांना बाजूला सारून धार्मिक जातीय तेढ निर्माण करणारे वक्तव्य काही लोकांकडून व्यक्त होत आहे.त्यामुळे दंगली सदृश्य परिस्थिती महाराष्ट्र निर्माण



झालेली आहे महाराष्ट्र पुरोगामी विचाराचा आहे इथे संत तुकाराम महाराज ,छत्रपती शिवाजी महाराज ,डॉ बाबासाहेब आंबेडकर ,महात्मा फुले, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराजांचा, यांचा वारसा लाभलेला महाराष्ट्र या महाराष्ट्राचे वाटोळे करण्याचा डाव आखलेला आहे. तो हाणून पाडण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने व तसेच शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी तात्काळ सोयाबीन ,चना खरेदी सुरू करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा यासाठी तहसीलदारांना मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले जर सात दिवसाच्या आत मध्ये चना व तुर खरेदी तसेच महाराष्ट्रामध्ये धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या सात दिवसात कारवाई करावी अन्यथा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने लोटांगण व फटके मार आंदोलन करण्यात येईल असा इशारा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने देण्यात आला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज वानखडे,जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे, शहर कार्याध्यक्ष चंदू डहाणे,दत्तापूर सेवा सहकारी संस्थेचे संचालक नितीन कनोजिया,आशिष शिंदे,पंचायत समितीचे माजी उपसभापती नितीन दगडकर,माजी पंचायत समिती सदस्य शुभम भोंगे, अविनाश इंगळे,माजी सरपंच मुकेश राठी,राजेंद्र भोंगे, विलास डुकरे, मयूर डुबे, तेजस दुबे, उमेश झीबळ, अंकुश कांकरिया, नंदू ढोले, आशिष तुपट, विजय झाडे, प्रकाश बेलसरे,उपसरपंच उमेश शिसोदे,सह मोठ्या संख्येने शेतकरी व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पुणे–नागपूर साप्ताहिक विशेष ट्रेन आज, उद्या

## प्रवाशांची गर्दी वाढल्याने मध्य रेल्वेद्वारे सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** – उन्हाळा, लग्नसराईमुळे सध्या रेल्वे तिकिटांची प्रतीक्षा यादी लांबच लांब वाढल्याने प्रवाशांना पुण्याकडे जाण्यासाठी चांगलाच आयपिटा करावा लागत असून आर्थिक सल्व्ही सोसावी लागत आहे. पुण्यात अमरावती जिल्ह्यातील चाकरमाने, विद्यार्थी मोठ्या संख्येत राहतात. त्यामुळे पुण्याला जाणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये चांगलीच गर्दी आहे. ते बघता मध्य रेल्वेने पुण्यासाठी १९ व २० मार्च रोजी विशेष ट्रेनची सोय केली आहे. बहुतांश प्रवासी हे अमरावती मॉडेल स्थानकावरून तसेच बडनेरा स्थानकावरून पुण्याकडे रवाना होत असतात. साप्ताहिक ट्रेन चांगला पर्याय आहे.साप्ताहिक विशेष ट्रेन क्र.०९४६९ ही १८ रोजी रोजी पुणे येथून दुपारी ३.५० वाजता निघाल्यानंतर नागपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता पोहोचेल. साप्ताहिक विशेष ट्रेन क्रमांक ०९४७० ही नागपूर येथून बुधवार, १९ मार्चला सकाळी ८ वाजता सुटेल आणि पुणे येथे त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पोहोचेल.तीन वातानुकूलित द्वितीय श्रेणी, १५ वातानुकूलित तृतीय श्रेणी, एक सामान्य द्वितीय श्रेणीसह कम गार्ड ब्रेक व्हॅन आणि एक जनरेटर व्हॅन, अशी या विशेष ट्रेनची रचना आहे. विशेष ट्रेन क्रमांक ०९४६७ ही पुणे येथून बुधवार, १९ मार्चला दुपारी ३.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी



६.३० वाजता पोहोचेल. विशेष ट्रेन क्रमांक ०९४६८ ही नागपूर येथून २० मार्चला सकाळी ८ वाजता सुटेल आणि पुणे येथे त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पोहोचेल. एक प्रथम वातानुकूलित, एक द्वितीय वातानुकूलित, २ तृतीय वातानुकूलित, ५ शयनयान, ६ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ सामान्य द्वितीय श्रेणी अशी यारेल्वेची संरचना आहे.मार्गात ही ट्रेन वर्धा, धामणगाव रेल्वे, बडनेरा, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, मनमाड, अहमदनगर, दौंड कॉर्डलाईन व उरुळी अशा मोजक्या स्थानकांवर थांबा घेणार आहे.

# अचलपूर तहसील कार्यालयाद्वारे मालमत्तेचा लिलाव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती:** थकबाकी न भरल्यामुळे जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेचा लिलाव अचलपूर तहसील कार्यालय करणार आहे. किसन शिवरामजी खेरडे यांच्या वारसांकडून येणे असलेल्या जमीन महसुलाच्या थकबाकीसाठी ही कारवाई करण्यात येत आहे. मौजा कांडली येथील भू-मापन क्रमांक ११२/२ मधील चार भूखंडांचा लिलाव होणार आहे. या भूखंडांचा दि. २४ मार्च रोजी दुपारी




१२ वाजता तहसील कार्यालय, अचलपूर येथे जाहीर लिलाव होणार आहे. या मालमत्तांवर असलेले सर्व भार, अनुदान आणि करार रद्द करण्यात आले आहेत. याबाबत अधिक माहिती आणि लिलाव प्रक्रियेच्या तपशीलांसाठी अचलपूर तहसील कार्यालयाशी संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्ण महिलेकडून परिचारिकेवर हल्ला ; सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

## आरोग्य विभागाच्या प्रमुखांना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन) शनिवारी (ता. १५ मार्च) रात्री १० वाजताच्या सुमारास वॉर्ड क्रमांक २ मध्ये एका महिला रुग्णाने कर्तव्यावरील परिचारिकेवर धारदार वस्तूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात परिचारिका गंभीर जखमी झाली असून, त्यांचे नाक व जबडा फ्रॅक्चर झाला आहे. जखमी परिचारिका लता सिरसाट यांनी शहर कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुन दोषीवर कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने या घटनेची गंभीर दखल घेतली असून तीव्र निषेध नोंदविला आहे. कर्तव्यावर कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची हमी घेण्याबाबत तसेच आवश्यक उपाययोजना तात्काळ करण्याबाबत संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रफुल वासनिक व सदस्यांनी आरोग्य विभागाच्या प्रमुखांना (जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता) निवेदनाव्दारे मागणी केली आहे. घडलेल्या प्रसंगाची हकीकत अशी की, ३५ वर्षीय महिला शनिवार दुपारपासून



महिला रुग्णांच्या वॉर्ड क्रमांक २ मध्ये दाखल होती आणि तिच्यावर उपचार सुरू होते. रात्रीच्या शिफ्टमध्ये परिचारिका लता सिरसाट कर्तव्यावर होत्या. त्यावेळी या महिला रुग्णाने त्यांच्या उपचाराबद्दल विचारणा केली. सिरसाट यांनी उपचार सुरू असल्याचे सांगितले. मात्र, त्यानंतर या महिला रुग्णाने पुन्हा वाद घातला आणि कथितरित्या मारहाण करत धारदार वस्तूने त्यांच्या चेहऱ्यावर वार केले. लता सिरसाट यांनी दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यात त्यांचा जबडाही फ्रॅक्चर झाला असून, रविवारी त्यांचा सीटी स्कॅन करण्यात असून शहर कोतवाली पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदवली आहे.

पोलिस कर्मचाऱ्यांसमोरच हा हल्ला झाल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने राज्यभरातील परिचारिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. यापूर्वीही अशा घटना घडल्या आहेत आणि संघटनेने परिचारिकांच्या सुरक्षेसाठी आवाज उठवला आहे, कोलकात्यातील घटनेनंतर संघटनेने इश्वरलज्ञ ठळललेप आंदोलन केले होते. अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात काही दिवसांपूर्वी किरकोळ कारणावरून काही समाजकंटकांनी नियमबाह्य तक्रार केल्यामुळे रुग्णालय प्रशासनाने परिचारिकांना निलंबित केले होते, ही घटना ताजी असतानाच ही घटना घडली आहे. अशा घटनांमुळे रुग्णसेवा देणाऱ्या परिचारिकांचे मनोधैर्य खचत आहे आणि त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे, असे संघटनेने म्हटले आहे.

# गौण खनिज त्याच भूखंडावर वापरले तर रॉयल्टी माफ

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

शहरातील इमारतीच्या पायांचे खोदकाम करताना त्याचठिकाणी गौण खनिजाचा वापर करावयाचा असेल, तर रॉयल्टी भरण्याची आवश्यकता नाही. मात्र, दुसऱ्या जागेवर गौण खनिजाची वाहतूक करण्यासाठी नियमानुसार रॉयल्टी भरावी लागेल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत सांगितले.



आमदार नरेंद्र मेहता यांच्या लक्षवेधीला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, गौण खनिज उत्खनन होत असलेल्या ठिकाणी तलाठी, सर्कल किंवा तहसीलदार भेट देतात. त्यांना टीएलआरसोबत घेऊन जाण्याची आवश्यकता नसते, तसेच चुकीची नोटीस कोणाला जात असेल तर तसे दाखवून देण्यात यावे. त्याबाबत चौकशी करून कारवाई केली जाईल, तसेच रॉयल्टीची पावतीदेखील केवळ एक वर्षच सांभाळून ठेवावी लागते. त्याबाबत धोरणात्मक निर्णय झाला आहे. जर कोणाला दहा वर्षांनंतर त्याठिकाणची वाहतूक करायची असेल तर तो प्रश्न निर्माण होतो. मात्र, त्यांनी संबंधित तहसीलदाराकडे अर्जाद्वारे मागणी केल्यास त्यांनाही काहीच अडचण येणार नाही.

**अभय योजनेबाबत विचार**

अनेक योजनांना चुकीच्या नोटीस आल्या आहेत, त्याचे निराकरण करण्यासाठी अभय योजना आणणार का, या प्रश्नाच्या उत्तरात बावनकुळे म्हणाले, अभय योजनेसाठी प्रलंबित प्रकरणांची व्याप्ती पाहावी लागेल आणि त्यानंतर याबाबत विचार करू. एकत्रित सर्व्हे क्रमांकावर कर्जाचा बोजा चढविला जातो. त्याचा फटका सर्वच शेतकऱ्यांना बसतो, तसेच नवीन कर्ज घेता येत नाही. याबाबत नियमावली तयार करत आवश्यकता वाटल्यास याबाबत बैठक घेऊन एकत्रित स्पष्टीकरण दिले जाईल. विकासकाला त्रास होणार नाही असे नियोजन करू.

# नागपूरमध्ये ११ ठिकाणी संचारबंदी

## ५० हून अधिक समाजकंटक ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

सोमवारी सायंकाळी तरुणांच्या दोन गटांत झालेल्या भीषण राड्यात काही असामाजिक तत्त्वांनी जाळपोळ केली. पोलिसांच्या दिशेने दगडफेक करीत धक्काबुक्की केल्याने ५५ जण जखमी झाले. यातील ३ मेयोमध्ये, तर १२ रुग्ण मेडिकलमध्ये भरती आहेत. जखमींमध्ये २४ पोलिसांचा समावेश आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शांतता कायम राहण्यावर सर्व समाजाने भर द्यावा, असे आवाहन केले.

**कुठे लावला कर्फ्यू**

कोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोधरानगर व कपिलनगर.

**असे झाले नुकसान**

२० हून अधिक वाहनांची जाळपोळ

७५ हून अधिक वाहनांची तोडफोड

३५ हून अधिक पोलिस जखमी

५० हून अधिक समाजकंटक ताब्यात

# पालकमंत्री बावनकुळे शनिवारी अमरावतीत, विविध कार्यक्रमांना हजेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शनिवार, २२ मार्चला दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. जिल्हा प्रशासनाने या बाबीला दुजोरा दिला नाही. परंतु तशा तोंडी सूचना प्राप्त झाल्या असून, त्यादृष्टीने इतर तयारी सुरू असल्याचे सांगण्यात आले. २२ मार्चला अमरावतीत श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे पुरस्कार वितरण, शारदा उद्योग मंदिराचा हिरक महोत्सव आणि अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलमधील नव्या यंत्राचा प्रारंभ, असे तीन कार्यक्रम आहेत. त्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरीही येत आहेत. त्यामुळे बावनकुळेही त्याच दिवशी अमरावतीत असतील, असे जाणकार सूत्रांचे म्हणणे आहे.

# नागपुरात हिंसा, रात्री ३ वाजेपर्यंत न्यायालयात सुरु होती सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

नागपूर हिंसा प्रकरणात पोलिसांनी संशयित आरोपींना अटक केली आणि पोलिस कोठडी मिळविण्यासाठी न्यायालयात हजर केले. न्यायालयीन कारवाई रात्री तब्बल ३ वाजेपर्यंत चालली. नागपूरच्या न्यायपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच हा अनोखा प्रसंग पाहायला मिळाला. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती सुलताना मैमुना यांच्या न्यायालयात रात्री तब्बल ३ वाजेपर्यंत सुनावणी सुरू होती.



संपूर्ण शहर झोपी गेले असताना, न्यायालयात वाद प्रतिवाद सुरूच होते. महल परिसरात झालेल्या दंगलीमुळे संपूर्ण भागात तणावपूर्ण स्थिती आहे. मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाल्यानंतर पोलिसांनी या भागात मोठा बंदोबस्त तैनात केला असून, अनेक ठिकाणी संचारबंदी लागू करण्यात आली आहे. गणेशपेठ पोलिसांनी मंगळवारी महल दंगल प्रकरणातील ५१ पैकी २७ आरोपींना न्यायिक मजिस्ट्रेट प्रथम श्रेणी न्यायालयात हजर केले. या सुनावणीसाठी विशेष सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती.

**दंगलीमुळे किराणा, खाद्यवस्तूंचा तुटवडा; कर्फ्युमुळे आठवड्यातील दुकाने बंद**

नागपुरात सोमवारी (१७ मार्च २०२५) दोन धार्मिक गटांत संघर्ष पेटल्यामुळे महाल, इतवारीसह परिसरात तणाव कायम आहे. तणावामुळे इतवारीतील किराणा ओळी सलग दोन दिवसांपासून बंद असल्याने शहरातील विविध भागातील किरकोळ दुकानात किराणा, खाद्यवस्तूंचा तुटवडा जाणवत असल्याचा दावा नागपूर चिल्लर किराणा व्यापारी संघाने केला आहे.


नागपुरातील किराणा ओळीत मोठ्या संख्येने ठोक दुकानांसह त्यांचे गोदामही आहेत. या ठोक दुकानदारांकडून नागपूरसह विदर्भातील विविध जिल्ह्यात किराणा खाद्यवस्तुंचा नियमित पुरवठा होतो. दरम्यान नागपुरातील महाल परिसरात सोमवारी रात्री (१८ मार्च) दोन धार्मिक गटात संघर्ष पेटल्यावर जमावाकडून कुऱ्हाडी, रॉड, दगडासह मिळेल त्या वस्तूने पोलिसांसह सामान्य नागरिकांवरही हल्ला केला गेला. तर दुसरीकडे अनेक वाहने पेटवत घरातही शिरण्याचा प्रयत्न केल्यावर शहरातील महाल, इतवारी, हंसापुरीसह परिसरात तणाव आहे.

# महानगरपालिकेकडून मालमत्ता करात ५०% सूट

## नागरिकांनी शेवटच्या संधीचा लाभ घ्यावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

चालू वर्षी म्हणजेच सन २०२४ - २०२५ या आर्थिक वर्षात अमरावती महानगरपालिकेकडून मालमत्ता कराच्या दरात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. जे मालमत्ताधारक चालू वर्षाचा २० मार्च,२०२५ पर्यंत मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना सामान्य करात ५०% सूट लागू राहील असे महानगरपालिकेकडून जाहीर प्रगटना द्वारे नागरिकांना कळविण्यात आले असून



जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी या शेवटच्या संधीचा लाभ घ्यावा म्हणून आवाहन करण्यात आले आहे.

कर संकलन व कर आकारणी विभाग अमरावती शहर महानगरपालिका यांच्या वतीने विविध सुट योजना देऊनही काही थकबाकीदार टॅक्स भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांच्यावर मनपा मार्फत धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार मनपा क्षेत्रात मालमत्ता कराच्या वसूलीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या वसूली पथकामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

तरी व्याज, शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा करावा व जप्तीसारखी कटू कार्यवाही टाळावी, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

# अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा १५ एप्रिलपासून : असे आहे परीक्षांचे वेळापत्रक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ परीक्षांना १५ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे. त्या अनुषंगाने परीक्षा विभागाने नियोजन चालविले असून वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहेत. यात सर्व सत्राच्या सम आणि विषम परीक्षांचा समावेश असणार आहे.

अधिसूचना क्रमांक १६/२०२५ अन्वये उन्हाळी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. तर दुसरीकडे परीक्षांर्थ्यांकडून उन्हाळी परीक्षांसाठी आवेदन पत्र मागविले जात आहे. ही कार्यवाही महाविद्यालयांना करावी लागणार आहे.



त्यानुसार विद्यापीठाने प्राचार्यांना कळविण्यात आले आहे.

परीक्षा विभागाने प्रकाशित केलेल्या अनुसूचीनुसार विद्या शाखानिहाय १२२ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात आले आहे. सीबीसीएस नवीन, विधी, अभियांत्रिकी, एनईपी पीजी, फार्मसी, कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान शास्त्र, एनईपी यूजी, शारीरिक शिक्षण आदी परीक्षांचा समावेश असणार आहे.

उन्हाळी परीक्षांमध्ये साधारणतः दीड लाख परीक्षार्थी आवेदन सादर करतात. त्या अनुषंगाने अमरावती, अकोला, वाशिम, बुलडाणा, यवतमाळ या पाचही जिल्ह्यातील १८३ महाविद्यालयाच्या केंद्रांवर या परीक्षा घेण्यात येतील. तयारी वेगाने केली जात आहे.

**– डॉ. नितीन कोळी, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, अमरावती विद्यापीठ**

**असे आहे परीक्षांचे वेळापत्रक**

१५ एप्रिलपासून पुढे : सत्र पद्धतीमधील सर्व विषम सत्राच्या परीक्षा व वार्षिक पद्धतीमधील परीक्षा

१९ मेपासून पुढे : सत्र पद्धतीमधील सर्व विषम सत्राच्या परीक्षा, एनईपी (यूजी) सत्र १ परीक्षा व वार्षिक पद्धतीमधील एनएईपी (पीजी)

१९ जूनपासून पुढे : बी.ए (सीजीएस) सत्र- २, बी.ए. (सीबीसीएस) सत्र -१ आणि सत्र -२, एन.ई.पी. (पीजी) सत्र- ४, एन.ई.पी. (यूजी) सत्र- २ अभ्यासक्रमाच्या परीक्षा तसेच शासनस्तरावर प्रवेश होणाऱ्या अभ्यासक्रमांच्या द्वितीय सत्राच्या परीक्षा आदी.

# जनता ग्राहक सहकारी संस्था ची निवडणूक २३ मार्चला : सर्वच पक्षाचे उमेदवार झाले एकत्र उभे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९दर्यापूर**

राजकीय नेत्यांनी स्वतः उभे न राहता त्या नेत्यांनी आपापले, मुले नातेवाईक आप्तेष्ट उभे करून स्वतः नेते मात्र झाले बाजूला महाराष्ट्र शासनाने २०२५ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीचा शुभारंभ जनता ग्राहक संस्थेतून झालेला आहे सहकारी संस्था च्या निवडणूक घेण्याचे आदेश दिल्यानंतर दर्यापूर येथील १९६० साली स्थापन झालेली जनता ग्राहक सहकारी संस्था दर्यापूर ची निवडणूक रणधुमाळी सुरु झाली असताना नामनिर्देशन पत्र दाखल केल्यानंतर दि १३ मार्च ला नामनिर्देशन पत्र माघार घेण्याचा दिवशी अनेक नेत्यांनी आपापले उमेदवार अर्ज मागे घेतले तरी पण निवडणूक अविरोध न



होतानिवडणुकीसाठी २६ उमेदवार कायम असल्याने २३ मार्च रोजी निवडणूक होणार आहे आता एकूण २६ फॉर्म शिल्लक असून निवडणूक होणार हे आता नक्की झाले आहे ह्या संस्थेत एकूण २९८ मतदार असून जवळपास २४ मतदार मय्यत आहे आता निवडणूक च्या रणधुमाळीत कोणते पॅनल व कोणते उमेदवार विजयी होणार व कोण उमेदवार कोणाकडून उभे राहणार हे उत्सुकतेचे ठरणार आहे त्यामध्ये आता १७ मार्च ला उमेदवार यांना चिन्ह वाटप होऊन येणाऱ्या २३ मार्च ला निवडणूक होणार आहे त्यामध्ये गोपाल गावंडे,प्रकाश रहाटे,सत्यजीत परिहार,अनिल बागडे,अनिल कुंडलवाल,अशोक कुमार उर्फ लालाजी अग्रवाल,विनायक उर्फ विनोद पवार,रामेश्वर चव्हाण,दिलीप देवराव वानखडे,प्रमोद राजगुरे, चित्रा अवतारे,जीवन कोतवाल, भरत शुक्ला,गोकुळ भडांगे,दिलीप चव्हाण,रविकांत काळे,सुरेश कानुनगो,अभय गावंडे,राजेश निंभेकर हे उमेदवार असून सर्व आपले नशीब आजमावत आहे. गोकुळ पाटील भडांगे हे ज्या बाजून उभे राहतील तेच पॅनल बाजी मारेल असे नेहमी दिसून येते निवडणूक अधिकारी म्हणून दर्यापूर सहाय्यक निबंधक यांच्या मार्गदर्शनाखाली हुरुबळे मॅडम ह्या काम पाहत आहे.

# फुले-आंबेडकर जयंती समारोहाच्या निमित्त खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९दर्यापूर**

आएसओ नामांकन व निती आयोग नोंदणी कृत एनजीओ महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट दर्यापूरच्या वतीने समाज क्रांतीचे प्रणेते महात्मा ज्योतिराव फुले व भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती समारोहाच्या निमित्ताने जीवन कार्यावर आधारित खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. कागदाच्या एकाच बाजूस सुवाच्य अक्षरात पाचशे शब्द मर्यादित लिहिलेले निबंध इच्छुकांनी ५ एप्रिल पर्यंत दहा रुपयांच्या पोस्ट तिकीट सह बंद पाकिटात संयोजक प्रदीप लांडे येवदा तालुका दर्यापूर जिल्हा अमरावती या पत्त्यावर पाठवावे.



असे आवाहन आयोजक प्रमुख विश्वस्त प्राचार्य निळकंठ बोरोळे, डॉ. श्रीकृष्ण गोरडे, महासचिव रविंद्र ढोकणे, दिनकर मावंदे, प्राचार्य भास्कर जावरकर, रामेश्वर धनोकार, प्राचार्य दत्तात्रय रेवस्कर, श्रीधर पवार,राजकुमार गिर्हे, अंबादास जावरकर, चंद्रशेखर आजनकर,संजय गणोरकर, राजेश भोगे, गजानन मेहरे, प्रविण हाडोळे, देवानंद भडांगे,गजानन करूले, हरिदास कविटकर,प्रा.प्रविण नवले,प्रविण बेलसरे यांनी केले आहे. प्रथम तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना व दहा उत्तेजनार्थ पुरस्कार विजेत्यांना स्मृतीचिन्ह देऊन फुले जयंतीच्या पर्वावर सन्मानित करण्यात येईल.

# कुठल्याही घटनेकडे तटस्थपणे बघणे गरजेचे - सुनील यावलीकर : 'वास्तव आणि जीवनमूल्ये'चे शिवाजी कॉलेजमध्ये प्रकाशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

प्रवाहाविरुध्दचे काम कधीही सोपे नसते. जीवावर उदार होऊन गेल्या ४५ वर्षांपासून हरिश देशमुख हे काम सातत्याने करीत आहेत. दुसऱ्यांसाठी न्यायाधीशांच्या भूमिकेत असलेला माणूस पटकन स्वतःसाठी वकील होतो. या दोन्ही भूमिकेतून बाहेर निघून कुठल्याही घटनेकडे तटस्थपणे बघणे गरजेचे आहे. ही भूमिका या पुस्तकातून साधण्यात हरीश देशमुख यशस्वी झाल्याचे दिसतात, असे प्रतिपादन उत्कृष्ट चित्रकार सुनील यावलीकर यांनी केले.

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अंनिस) खंदे शिलेदार तथा राष्ट्रीय महासचिव हरीश देशमुख लिखित 'अंधश्रद्धा : वास्तव आणि जीवनमूल्ये' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा लेखक, वक्ते, चित्रकार असलेल्या सुनील यावलीकर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या दृकश्राव्य सभागृहात झालेल्या या सोहळ्यास अंनिसचे डॉ. बबनराव बेलसरे, ॲड. गणेश हलकारे, प्रा. नदीम खान, संजय देशमुख, नरेश चव्हाण, सुधीर वासे उपस्थित होते.



या वेळी याच पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद 'सुपरस्टिशन : मिथ्स अँड रिलिटी' आणि मेळघाट या आदिवासीबहुल लोकांच्या बोलीभाषेशी निगडित हिंदीतील 'डायन न टोनही सिर्फ नारी' या पुस्तकाचे प्रकाशनही पार पडले आले. हरीश देशमुख हे गेल्या ४५ वर्षांपासून या क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करत आहेत. त्यांनी अनुभवलेल्या घटना या पुस्तकात शब्दबद्ध केल्या आहेत. अशाप्रकारे पुस्तक रूपाने निर्माण केलेला हा ठेवा नवीन पिढीच्या कार्यकर्त्यांना सतत प्रेरणा देत राहील, असे मत या वेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले, तर पुस्तक लिहितानाचे काही अनुभव हरीश देशमुख आणि इंग्रजी भाषांतरकार प्रा. नदीम खान यांनी कथन केले. मेळघाटातील रेहट्याखेडा येथे नुकत्याच घडलेल्या घटनेच्या संदर्भाने 'न टोनही, न डायन सिर्फ नारी' ही हिंदी सचित्र पुस्तिका तयार करण्यात आली आहे. ही पुस्तिका आदिवासी हिंदी पट्ट्यामध्ये त्यांच्यापर्यंत पोहोचवणे सुलभ होईल, अशी व्यवस्थाही निर्माण केली आहे. मूळ पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद नदीम खान यांनी केला आहे. ते म्हणाले, या पुस्तकाचे भाषांतर करण्याचे काम माझ्यासाठी खूप महत्वाचे ठरले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेखर पाटील आणि सूत्रसंचालन हरीश केदार यांनी केले. आभार मिलिंद मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमासाठी राजेंद्र इसाने, प्रा. अनंतराव देशमुख, रणजित घोडेस्वार, राजीव खिराडे, पुरुषोत्तम दाहेदार, राजेंद्र भांबोरे, सुभाष पांडे, सुधीर लसणकर, गजानन सूर्यवंशी, आयुष इंगोले, श्रीकृष्ण धोटे, नीलेश कांचनपुरे यांनी परिश्रम घेतले.

# गुणवंत विद्यार्थ्यांना विमानवारीचे गिफ्ट

## मुख्य कार्यकारी अधिकारींचा पुढाकार : अमरावती जिल्ह्यातील २८ विद्यार्थ्यांना घडणार दिल्लीवारी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

जिल्हा परिषद शाळा अंतर्गत गुणवंत विद्यार्थ्याची मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी दखल घेत विद्यार्थ्यांना मराठी नववर्षाच्या पूर्वपर्वावर दिल्लीची विमानवारी घडविणारं आहे.

दिनांक २५ ते २७ मार्च दरम्यान जिल्ह्यातील २८ विद्यार्थी वातानुकूलित झुकझुक गाडीचा प्रवास करत दिल्ली गाठणार आहे. दिल्ली पर्यटन करून थेट विमानाने नागपूरमार्गे अमरावती परतणार आहे.शिष्यवृत्ती परीक्षा, एन.एन.एम.एस परीक्षा, माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत विविध गुणवंत विद्यार्थ्यांची या सहलीसाठी निवड करण्यात आली.

चौदा पंचायत समितीमधील प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांची या सहली साठी निवड कण्यात आली. सहली दरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी चार शिक्षक - शिक्षिका सोबत राहणार आहे. या सहलीत दिल्लीतील विविध प्रेक्षणीय, राष्ट्रीय स्मारके, ऐतिहासिक व प्रशासकीय वास्तूंना भेटी देणार आहे.

राष्ट्रपती भवन, लाल किल्ला, लोटस मंदिर, संसद भवन, राजघाट, कुतुबमिनार, इंदिरा गांधी मेमोरियल, इंडिया गेट,अक्षरधाम मंदिर अश्या प्रसिद्ध स्थळांसह दिल्लीतील काही शाळांना हे विद्यार्थी भेट देणार आहे. जिल्ह्यातील एवढ्या मोठ्या विद्यार्थी संख्येने दिल्लीवारी करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या करीता शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनाने, विस्तार अधिकारी अशपाक अहमद आदींनी परिश्रम घेतले.

**तीन दिवसीय सहल**

२५ मार्च रोजी सकाळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र या सहलीला हिरवी झेंडी देणार आहे. सकाळी वातानुकूलित रेल्वे प्रवास करून सर्व विद्यार्थी दिल्ली येथे जाणार आहे. तीन दिवस व दोन रात्र सहलवजा पर्यटन करून दिल्लीचा ऐतिहासिक व विविध अंगांनी अभ्यास करून परत दिल्ली ते नागपूर विमान प्रवास करणार आहे. पुन्हा नागपूर ते अमरावती वातानुकूलित रेल्वे प्रवास करून अमरावती येथे पोहोचणार आहे.

**विद्यार्थी अनुभवणार व्हिआयपी ट्रीटमेंट**

ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या विविध जाती धर्मातील गोर गरीब कुटुंबातील विद्यार्थी प्रथमच आपल्या पालकांशिवाय रेल्वे मध्ये वातानुकूलित प्रवास करणार आहे. विशेष म्हणजे चांगल्या दर्जाच्या ठिकाणी त्यांची निवास व्यवस्था राहणार असून दिल्लीतील शाळांना भेटी देऊन शिक्षक व विद्यार्थी तेथील अभ्यासक्रम व उपक्रमांचा अभ्यास करणार आहे.विशेष म्हणजे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसोबत प्रज्ञावंत व उपक्रमशील शिक्षकांचा या उपक्रमात सहभाग राहणार आहे.

**गुणवत्तेची भेट**

माझ्या जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात्मक परीक्षेमध्ये यश संपादन केले त्या यशाची पावती म्हून या विध्यर्थ्याना दिल्लीची विमानवारी भेट देत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी सांगितले.

# कुष्ठरोग निवारणार्थ अमरावतीच्या तपोवन सेवाभावी संस्थेला १० कोटी अनुदान द्या

## आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी मांडला तारांकित प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज बुधवार दिनांक १९-३-२०२५ रोजीच्या कामकाजामध्ये तारांकित प्रश्न क्र. ३ -राज्यात कुष्ठरोग निर्मूलनासाठी करावयाच्या उपायोजनासंदर्भात चर्चा करतांना अमरावतीच्या आमदार -सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी अमरावती येथील स्वर्गीय दाजीसाहेब पटवर्धन यांची कर्मभूमी असलेल्या तपोवन संस्थेमध्ये कुष्ठरोग निर्मूलन, देखभाल, औषधोपचार व पुनर्वसन आदींकरिता १० कोटीचे अनुदान देण्याची शासनाकडे मागणी केली आहे.

अधिवेशनात आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले की, राज्यात राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी सन १९५५-५६ मध्ये सुरु केली असली तरी अद्यापही मोठ्या प्रमाणात कुष्ठरोगी आढळून येत आहे. त्याचे कारण असे की राज्यात कुष्ठरोगासाठी कार्य करण्याऱ्या आनंदवन ,तपोवन तसेच इतर संस्था यांना कुष्ठरोगाची देखभाल व औषधोपचार करण्यासाठी प्रति रुग्ण देण्यात येणारे



अनुदान अत्यल्प आहे. मागील १२ वर्षा पासून त्यामध्ये कोणतीही वाढ झाली नसल्याने संस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब आमदार महोदयांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.तसेच काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी वरोरा येथील आनंदवन ला भेट दिली असता कुष्ठरोग निवारणार्थ स्व. बाबा आमटे यांच्या आनंदवन संस्थेला १० कोटीचे अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी केली . राज्यात कुष्ठरोग निवारणार्थ प्रयत्न होत असतांना अमरावती येथे स्व. डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटववर्धन यांची तपोवन संस्था मागील ७६ वर्षापासून कुष्ठरोग निर्मूलनाचे कार्य करत आहे. कुष्ठरोगी बांधवांना स्वाभिमानी, स्वावलंबी जीवन जगण्यासाठी जिद्द निर्माण करण्याचे कार्य मागील ७६ वर्षांपासून तपोवन संस्थेमध्ये सुरु आहे. केवळ पदाधिकारी व सहकारी यांच्या सेवाभावी कार्यातून तपोवन हि संस्था चालत असून कुष्ठरुग्णांसाठी हे एक आपुलकीचे घर बनले आहे. आज कुष्ठरोगबाधित रुग्ण या तपोवनात आपले आयुष्य मोठ्या आनंदाने जगत आहेत. त्यांनी शेती, बाग फुलविली असून , त्यांचे कौशल्य विकसित झाल्याने अनेक कलाकुसरीच्या वस्तू सुद्धा कुष्ठरुग्णांनी साकारल्या आहेत. कुष्ठरुग्णांना सामाजिक जीवन जगता यावे, तसेच त्यांना समाजात संरक्षण मिळणे , वैद्यकीय सुविधा, योग्य प्रशिक्षण तसेच मुक्त शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या ज्ञानातही भर पडावी. यासाठी त्यांचे संगोपन व पुनर्वसन करण्यासाठी शासनाकडून तपोवन संस्थेला १० कोटींचे अनुदान देण्याच्या मागणीचा आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी पुनरोच्चार करीत तपोवन मधील समस्येबाबत सभागृहाला अवगत केले.तसेच कुष्ठरोग निर्मूलनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने पुनर्वसन समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्या समिती मध्ये इतर सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी घेतले पण तपोवन संस्थेतील प्रतिनिधी समितीमध्ये घेण्यात आले नाही. त्यामुळे तपोवन च्या समस्या कोण मांडणार ? असा प्रश्न करून आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी तपोवन संस्थेतील एक-दोन पदाधिकारी शासनाच्या पुनर्वसन समितीवर घेण्यात यावे, याबाबत आपण मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री महोदयांना पत्र दिले असून याबाबत निर्णय घेण्याची विनंती सभागृहासमक्ष केली.

यावर उत्तर देतांना राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, राज्यातील कुष्ठरोगींसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहित करण्यासाठी शासन चांगल्या तऱ्हेने काम करणार आहे. तसेच अधिवेशनानंतर आपण कुष्ठरोग संदर्भात काम करणाऱ्या संस्थांची बैठक घेऊन त्यांच्या उणीवा व सूचना आणि त्यांना वेगवेगळ्या कमेटींवर काम करण्याच्या दृष्टीने संधी देण्याबाबत सुद्धा कामकाज करणार असल्याची माहिती मंत्री महोदयांच्या वतीने सभागृहातून देण्यात आली.

# बेलोरा विमानतळ डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव मिळालेच पाहिजे

## शाहू फुले आंबेडकर भाऊसाहेब देशमुख फाउंडेशन अमरावतीचे,जिल्हा कचेरीत निदर्शने बेलोरा अमरावती विमानतळास डॉ पंजाबराव देशमुख यांचे नाव द्या - किशोर बोरकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

बेलोरा अमरावती विमानतळास डॉक्टर पंजाबराव देशमुख नाव देण्यात यावे विमानतळाच्या दर्शनी भागात डॉ. पंजाबराव देशमुख यांचा पूर्ण कृती पुतळा बसविण्यात यावा यासह अन्य मागण्या घेऊन फुले शाहू आंबेडकर भाऊसाहेब देशमुख फाउंडेशन अमरावती द्वारा डॉ.गणेश पाटील, माजी कुलगुरू, शाहू, फुले आंबेडकर भाऊसाहेब देशमुख फाउंडेशन अमरावतीचे समन्वयक किशोर बोरकर, डॉ .बी.आर.देशमुख, अँड गजानन पुंडकर,अँड.पी.एस खडसे, डॉ . श्रीकांत देशमुख,भैय्या साहेब निचळ, प्राचार्य गोपीचंद मेश्राम, रामेश्वर अभ्यंकर,समीर जंवजाळ प्रा.सुजाता झाडे,प्रा.प्रदिप दंदे, यांच्या नेतृत्वात जिल्हा कचेरी परिसरात निदर्शने देण्यात आली व आपल्या मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले.



बेलोरा अमरावती विमानतळास डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे यासाठी विविध सामाजिक संघटना गत चार ते पाच वर्षापासून मागणी करीत आहेत तसेच अमरावती जिल्हा परिषदेने व महापालिकेने सर्वानुमते ठरावही पारित करण्यात आला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.यावेळी बेलोरा विमानतळास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव मिळालेच पाहिजे भाऊसाहेब देशमुखांचा विजय असो डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर की जय च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता.१३ जुलै २०१९ रोजी बेलोरा विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या प्रसंगी तत्कालीन आमदार डॉ. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वाखाली बेलोरा विमानतळास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे या मागण्यांचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात आले

> भाऊसाहेबांच्या राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन विमानतळस नाव द्यावे- किशोर बोरकरपंजाबराव देशमुख देशाचे पहिले कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांना मदत व्हावी व त्यांचा विकास व्हावा म्हणून देशांतर्गत कृषक समाजाची स्थापना केली देशभरात भाऊसाहेबांना मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण देशात विदेशात आहेत भाऊसाहेब देशमुख यांच्या राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन बेलोरा अमरावती विमानतळास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे अशी प्रतिक्रिया शाहू फुले आंबेडकर भाऊसाहेब देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक किशोर बोरकर यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली

आहे एप्रिल महिन्यात विमानतळ सुरू होणार असल्याने देशाचे पहिले कृषिमंत्री डॉक्टर भाऊसाहेब देशमुख तसेच त्यांचा आम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह संविधान निर्मिती सदस्य म्हणून मोलाची भूमिका त्यांनी पार पाडली आहे. बेलोरा विमानतळ डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे,बेलोरा या विमानतळावरून अमरावती मुंबई, पुणे व दिल्ली प्रवासी वाहतूक सुरू करण्यात यावी या मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले.

आंदोलनात शाहू फुले आंबेडकर भाऊसाहेब देशमुख फाऊंडेशनचे समन्वयक किशोर बोरकर, डॉ. बी आर देशमुख, डॉ. गणेश पाटील, अँड पी एस खडसे प्राचार्य गोपीचंद मेश्राम ,समीर जवंजाळ भैय्यासाहेब निचळ,अजय लेंढे,प्रा. अनिल देशमुख प्रा.डॉ. सुजाता झाडे, राजाभाऊ चौधरी संकेत पाटील नरेशचंद्र काठोळे अंजली ठाकरे अश्विनी चौधरी, समाधान वानखडे, चंद्रकांत मोहिते ,संजय ठाकरे, रामेश्वर अभ्यंकर, सुधाकर तलवारे ,प्रदीप ददे, जगदीश गोवर्धन, हेमंत देशमुख,प्रदीप राऊत विजय शिंदे ऍडव्होकेट गजानन पुंडकर सुरेश खातोरे सुभाष देशमुख गजानन पुंडकर सुरेश खोटरे मोहन चौरे सुरेश आतकरे महेश देशमुख आशिष देशमुख मनीष पाटील अतुल देशमुख निलेश ठाकरे विलास ठाकरे रमेश रामटेके नरेश देशमुख किशोर वडनेरकर सुधाकर टाले रविंद्र शिरसाट संजय ठाकरे शितल देशमुख विजया देशमुख शिल्पा राऊत प्रकाश तायडे विलास दळवी प्रमोद कुचे विनोद देशमुख सुरेश दहिकर बुद्ध दास इंगोले लक्ष्मण वाघमारे राजेंद्र ठाकरे प्रशांत मेश्राम मनीषा देशमुख प्रशांत विघे भारत डोंगरे गजेंद्र पात्रे छाया पात्रे प्रकाश फाटे सलीम मिरावाले विविध राजकीय सामाजिक संघटना संस्थांचे पदाधिकारी सदस्य कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

यवतमाळ जिल्ह्यात चिलगव्हाण येथील शेतकरी साहेबराव करपे,' त्यांची पत्नी मालतीताई करपे आणि कुटुंबातील चार मुलांच्या ३९ व्या स्मृतिदिनानिमित्त शेतकऱ्यांकडून आज बुधवारी (ता. १९) सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत, पंचवटी चौक, शिक्षण महर्षी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याजवळ एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले.

१९ मार्च १९८६ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील शेतकरी साहेबरावजी करपे व त्यांची पत्नी मालतीताई तसेच त्यांच्या चार लेकरांनी सहकुटुंब कर्ज व नापिकीमुळे पवनार जवळच्या दत्तपूर आश्रमात आत्महत्या केली होती. ही महाराष्ट्रातील पहिली शासनमान्य शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद आहे. १९ मार्च २०२५ रोजी करपे कुटुंबीयांचा ३९ वा स्मृतिदिन आहे, सन २०१७ पासून महाराष्ट्रातील शेतकरी समाजाचे लाखो संवेदनशील लोक १९ मार्चला उपवास अथवा एक दिवस अन्न त्याग करतात. हा उपवास धार्मिक नाही, हे उपोषण राजकारण नाही, हा एक दिवसीय अन्नत्याग संवेदनशील माणसांनी व्यक्त केलेला हुंकार आहे आणि शेतकरी स्वातंत्र्याचा एल्गार आहे. करिता आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजलीअर्पण करण्यासाठी व शेतकरी स्वातंत्र्याचा निर्धार करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील तमाम शेतकरी समाज व चळवळीतील शेतकरी पुरुष व महिला भगिनींनी बुधवारी (ता.१९ मार्च) सकाळी नऊ वाजता पंचवटी चौक, शिक्षण महर्षी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याजवळ एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यासाठी एकत्रीत आले होते.

# २० व २१ मार्च रोजी विद्यापीठ भारत जिल्हा 'विकसित युथ पार्लमेंट-२०२५

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

केंद्र सरकारच्या युवा कार्य व खेळ मंत्रालयाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्न अमरावती, अकोला, यवतमाळ वशिम जिल्हत्र विद्यार्थ्यांसाठी 'विक भारत युथ पार्लमेंट - २०२५' चे तारीख २० व २१ मार्च २०२५ रोजी युवती डॉक्टर डॉ. श्रींत स्मृती सशोधक केंद्राच्या अधिकाऱ्यांच्या तुम्हाला १०.३० लोकांना मदत करण्यात आली आहे. विकास भारत युवा खासदार १५० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

अमरावती, अकोला, यवतमाळ व वाशिम या चार जिल्ह संदेश १८ ते २५ वर्ष वयोगटातील विद्याथ्र्य दि. १६ मार्चपर्यंत माय भारत स्वतःच्या वक्तृ शेलीत विकसित भारत म्हणजे काय? या विषयाचा एक स्थानिकाचा व्हिडीओ मागचा मार्ग आला होता. त्या अधिक दि. १७ मार्च, २०२५ रोजी स्क्रीनिंग कमिटीद्वारे १५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. सदर निवड करण्यात आली विद्यार्थ्यांना दि. २० व २१ मार्च 'वन नेशन, वन इक्शन : फेरव्ह दीव्ह दीवे फॉर भारत' विषयावर आपले मत ३ जगामध्ये मांडावे तयार आहे. सदर १५० विद्याथ्र्य उत्कृष्ट १० विद्यार्थ्यांची राज्य संख्या युथ पारमेंट-२०२५ निवडीसाठी निवडण्यात आली आहे.

सदर कार्यक्रमाला कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिसभा सदस्य डॉ. शांत विघे, श्री. अमित देशमुख, श्री. नितिन टाले, पोलिस अधीक्षक श्री. पी. टी. पाटील, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. देवलाल आठवले, राष्ट्रीय सेवा योजना संचालक, डॉ. निलेश कडू, जिल्हा युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र कु. स्नेहल बासुतकर नियंत्रण व्यवस्था आहे.

# अजितदादांनी 'खास माणसाला' आमदार केलं, पण राणा दाम्पत्याचं टेन्शन वाढलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने विदर्भातील एकूण सात विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवली होती. यापैकी सहा आमदार निवडून आले आहेत. विदर्भातील स्ट्राईट ९९ टक्के राहिला. पण आता अमरावतीच्या संजय खोडके यांना विधान परिषदेत पाठवून राष्ट्रवादीने आमदारांची संख्या ७ केली आहे. मंत्रिमंडळाच्या विस्ताराच्या वेळी अजित पवार यांनी विदर्भाला बरोबरीचा वाटा दिला जाईल असे स्पष्ट केले होते. खोडके यांना उमेदवारी देऊन दादांनी आपला शब्द पाळला आहे.

संजय खोडके आधी मंत्रालयात नोकरीला होते. उपमुख्यमंत्री असताना छगन भुजबळ, आर.आर. पाटील यांचे ते स्वीय सहायक, विशेष कार्य अधिकारी होते. त्यामुळे मंत्रालयात आणि राजकारणात त्यांचे सुरुवातीपासूनच घनिष्ट संबंध आहेत. संघटन कौशल्यासोबत खोडके यांचा जनसंपर्क सुद्धा प्रचंड आहे.

याच जनसंपर्काच्या जोरावर संजय खोडके यांनी पत्नी सुलभा यांना विधानसभेच्या रिंगणात उतरवले. २००४ मध्ये त्यांनी बडनेरा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून विजय मिळवला. २००९ मध्ये त्यांचा पराभव झाला. याच दरम्यान, संजय खोडके यांनी नोकरीच राजीनामा दिला आणि तेही राजकारणात सक्रिय झाले. अजित पवार यांची सावली म्हणून वावरु लागले.

२०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीवेळी नवनीत राणा यांच्या उमेदवारीला खोडके दाम्पत्याने उघड विरोध केला होता. त्यामुळे त्यांची पक्षातून हकालपट्टी झाली होती. त्यानंतर ते काँग्रेस पक्षात गेले. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत सुलभा खोडके यांचा पराभव झाला. २०१६ मध्ये स्वतः



संजय खोडके यांनी अमरावतीमधून पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढवली. मात्र त्यांनाही अपयश आले.

त्यानंतर खोडके दाम्पत्य पुन्हा राष्ट्रवादीत परतले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आघाडीची डजेस्टमेंट म्हणून सुलभा खोडके यांनी काँग्रेसकडून निवडणूक लढवली आणि विजयही मिळवला. पण त्या केवळ तांत्रिकदृष्ट्या काँग्रेसच्या आमदार होत्या. मनाने पतीसोबत राष्ट्रवादीतच होत्या. अजित पवार चाळीस आमदार घेऊन बाहेर पडल्यांनतर खोडके दाम्पत्यही त्यांच्यासोबत गेले.

त्यानंतर विधानपरिषद निवडणुकीत क्रॉस व्होटिंग केल्याच्या आरोप करत काँग्रेसने सुलभा खोडके यांचे निलंबन केले. त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला आणि १० मिनिटात उमेदवारी जाहीर झाली. यंदा सुलभा खोडके पुन्हा निवडून आल्या आहेत. आता राष्ट्रवादी काँग्रेसने संजय खोडके यांना उमेदवारी दिल्याने एकाच घरी दोन आमदार अमरावतीकरांना बघायला मिळणार आहे.

**पश्चिम विदर्भात पक्षवाढीला मदत होणार :**

काहीही असले तरी संजय खोडके यांना अमरावतीमधून डावलने दोन्ही काँग्रेसला शक्य झाले नाही. अमरावतीमध्ये पॉवर फुल नेते म्हणून संजय खोडके यांची ओळख आहे. संपूर्ण विदर्भातच त्यांचा जनसंपर्क आहे. प्रत्येक शहरात त्यांचे स्वतःचे नेटवर्क आहे. अजितदादा यांना विदर्भात खासकरून पश्चिम विदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसला मजबूत करण्यासाठी खोडके यांची मोठी मदत होणार आहे.

**अमरावतीमध्ये राणांपुढे आव्हान**

जोडीला अमरावतीमध्ये राणांपुढे आव्हान उभे राहणार आहे. कारण खोडके पती-पत्नीला भाजप नेत्या नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांचे कट्टर विरोधक म्हणून ओळखले जाते. अमरावतीच्या राजकीय मैदानात या दोन्ही दाम्पत्यांचा कायमच एकमेकांशी संघर्ष पहायला मिळतो. २०१४ नंतर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही हा संघर्ष बघायला मिळाला होता.

महायुती असूनही खोडके यांनी राणांचे काम करायचे लांबच पण आपले नाव आणि फोटो वापरायलाही विरोध केला होता. राणांच्या पराभवाला खोडके यांनी हातभार लावला होता. स्थानिक राजकारणात राणा यांना बच्चू कडू, यशोमती ठाकूर यांच्यासोबत खोडके दाम्पत्याचे आव्हान आजही आहे. आता या आव्हानाला अजितदादांनी आणखी एक आमदारकी देऊन आणखी ताकद दिली आहे.